# मोगऱ्याचीं फुलें.

अर्थात्

गंगाधर रामचंद्र मोगरे

यांची कविता.

गुच्छ ४.

प्रथमावृत्ति, १०००

आगस्ट, १९१९.

किंमत ६ आणे.

प्रत्येक गुच्छाची किंमत सहा आणे. चारही गुच्छ एकत्र, किंमत १। रुपया.

SHRI CHA. PRATAPSINH MAHARAJ (THORLE) NAGAR WACHANALAYA, SATARA.
088782

प्रकाशकः—नाडकर्णी आणि मंडळीसाठीं—

अनंत आत्माराम मोरमकर, ४०२, ठाकुरद्वार मुंबई.

प्रिंटरः—अनंत आत्माराम मोरमकर,

श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ४०२, ठाकुरद्वार, मुंबई,

प्रकाशनाचे सर्व हक्क प्रकाशकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.

...गर वाचनालय,

# मोगऱ्याचीं फुलें.

## गुच्छ चौथा.

[ अनुक्रमणिका. ]


| | पृष्ठ |
|---|---|
| आर्यमातृविलाप. ... ... | १ |
| विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांचा मृत्यु. ... | ९ |
| दुष्काळागमन. ... ... | १२ |
| मुरारजी गोकुळदास. ... ... | १६ |
| श्रीमद्दयानंदनिधन. ( मृत्यु ३० आक्टोबर १८८३ ) | १९ |
| महाराज तुकोजीराव होळकर. ... ... | २५ |
| जयाजीराव महाराज शिंदे. ... ... | २७ |
| रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक.... ... | २९ |
| सौभाग्यवती डॉ. आनंदीबाई जोशी.... ... | ३४ |
| फर्ग्युसनविलाप.† ... ... | ३८ |
| महाराणी व्हिक्टोरिया. ... ... | ४१ |
| लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर. ... | ४५ |
| हरि महादेव पंडित.* ... ... | ४८ |


† ही कविता लेडी फर्ग्युसन यांच्या हृदयद्रावक मृत्यूनंतर लौकरच लिहून नोटबुकींत पडून राहिली होती.

* वास्तविक हें ( अपूर्ण ) काव्य हरिपंत पंडित यांच्या मृत्यूनंतर ( १५. ३. ९९ ) लौकरच लिहिण्यांत आलें. परंतु २३ श्लोक पुरे झाल्यावर पुढील श्लोकांत 'विविधज्ञानविस्तार' हें नांव यतिभंग टाळून आणि अर्थहानि न होतां गोवून देणें शक्य न झाल्यामुळें जें घोडें अडलें तें अडलेंच ! असाच प्रकार कांहींसा दयानंद स्वामींवरील शोकगीतासंबंधानें झाला.

गंगाधर रामचंद्र मोगरे.

जन्म—२१ जानेवारी १८५७
मृत्यु—११ मार्च १९१५

# उपोद्घात.

१. आधुनिक कविश्रेष्ठ रा. गंगाधर रामचंद्र मोगरे यांनीं इह-लोकींची यात्रा पूर्ण केल्यास चार वर्षें झालीं. मोगऱ्यांच्या कवितांचा पहिला गुच्छ १९०२ सालीं प्रसिद्ध झाला, व दुसराही प्रसिद्ध झालेला त्यांनीं डोळयांनीं पाहिला. त्यांच्या निधनानंतर लगेच उपहासकाव्यात्मक तिसरा खंड प्रसिद्ध झाला, आणि वाचकांच्या सुदैवानें विख्यात व कसलेल्या हरीभाऊ आपटयांनीं त्याला प्रोत्साहनपत्ररूपी प्रसादपटानें झांकल्यामुळें त्या काव्यखंडाला विशेष रमणीय स्वरूप आलें. आज प्रकाशकांच्या दृढ-निश्चयी स्वार्थत्यागामुळें चौथा गुच्छ प्रसिद्ध होत आहे; व लौकरच पांचवा गुच्छ प्रसिद्ध होईल तेव्हां हा मोगऱ्यांचा हार पूर्ण तयार होऊन सरस्वती-मातेच्या चरणीं अर्पण केला जाईल, आणि मोगऱ्यांचें श्राद्धकार्य पूर्ण होऊन त्यांचें विस्तृत मित्रमंडळ त्यांच्या ऋणांतून उत्तीर्ण होईल. लोक गंगेच्या नित्य रूपांतर होणाऱ्या वाळवंटांत कोणाही नरपुंगवाचा कीर्तिस्तंभ चिरस्थायी राहण्याकरितां त्याचें स्वतःचें ध्येय व चरित्र उदारमनस्क व उदात्त असलें पाहिजे, त्याचा अपत्यवंश अथवा शिष्यविस्तार समर्थ व कर्तुत्वशालीं पाहिजे, आणि त्याचें सुहृन्मंडळ देखील तितकेंच श्रेष्ठ असावें लागतें. कोणाला हें सर्व भाग्य जीवंतपणीं पाहावयाला सांपडतें, तर निरवधि काल आणि विपुला पृथ्वी आपला समानधर्मा केव्हां तरी उत्पन्न करीलच करील अशा दृढनिश्चयानें काम करणाऱ्या कोणा महा-त्म्यांची कीर्ति त्यांच्या निधनोत्तर दृढावत जाते. मोगऱ्यांची सारस्वतसेवा निरपेक्ष व निःपक्षपाती असल्यामुळें त्यांच्या बहुविध सुहृत्संघानें त्यांचें जिवंतपणीं कौतुक केलें, आणि पुढेंही करील. आधुनिक कविमंडळांत हा मान फक्त रेव्हरंड टिळक, कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर व 'केशवसुत' यांच्या वांटयाला आला आहे. बाकीच्यांची पुण्याई कालांतरानें फळ

पावेल तेव्हां खरी. धर्म अथवा ध्येय, बुद्ध अथवा परमश्वर किंवा स्वदेशासारखें दुसरें उपास्यदैवत, आणि संघ अथवा पूर्वप्रस्तुत वाङ्मयसेवक, या सर्वांची विनयपूर्वक अनन्यभावें उपासना झाल्यावांचून कालपटावर चिरस्थायी ठसा उमटणें शक्य नाहीं. ही उपासना मोगऱ्यांनीं कितपत पार पाडली हें सर्वविश्रुत आहेच, आणि. रा. सा. मोरमकरांचा स्मारकयत्न मोगऱ्यांच्या संघसेवेची साक्ष पटवीत आहे.

२. ज्यानुआरी सन १८५८ मध्यें मोगऱ्यांचा जन्म झाला, आणि १८८६ सालीं म्हणजे वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी त्यांनीं मुंबईच्या रॅायलएशियाटिक सोसायटीच्या पुस्तकालयांत नोकरी धरली. या विस्तीर्ण व बहुविध ग्रंथसंग्रहालयांत त्यांनीं अठ्ठावीस वर्षें काढलीं, आणि त्यांच्या कुशाग्र आणि अप्रतिहत काव्यस्फूर्तीला येथें पूर्ण अवकाश मिळाला. कवितेकडे त्यांचा ओढा बाळपणापासूनच होता; आणि 'खरी राजनिष्ठा,' 'विष्णुशास्त्री पंडित,' इत्यादि कविता त्यांनीं आपल्या अठरा--एकोणिसाव्या वर्षींच प्रकाशित केल्या होत्या. सरासरी वीस वर्षें पावेतों त्यांचें लेखनकौशल्य वर्णनात्मक व शोकप्रद काव्यांतच उचंबळलें, आणि पुढील कोष्टकावरून स्पष्ट दिसेल कीं, त्यांचीं बहुतेक काव्यें शोकरसपूर्णच जास्त. *

---

*रसिकश्रेष्ठ सारस्वतवीर हरि महादेव पंडित हे तारीख १५ मार्च १८९९ रोजीं कैलासवासी झाले, त्यांना तिलांजलि देतांना, आजपर्यंत आपण केलेली भाषासेवा मुख्यत्वें शोकरसाची होती असा स्वतः मोगऱ्यांनीं कबूलजबाब दिलेला आहे.

" नाहीं शोकरसीं मजा, रस तरी कां आळवाना दुजा ? "<br>
जीचे हे परिसोनि बोल दिधली म्यांही विलापा रजा ॥<br>
अंतर्बाह्य सुशीलता सुविमला भागीरथीसारखी<br>
गेली सोडुनि तीहि मूर्त कविता हा लोक माझी सखी'! २

ज्या कविताविश्राम जन्मसहचरीच्या विनयी व विनोदी स्पष्टोक्तीमुळें मोगऱ्यांच्या चेतोवृत्ति शोकरसांतून हास्यरसांत वक्रीभूत झाल्या

**( १ ) वर्णनपरः—**

कथात्मकः—( १ ) बुद्धजन्म; ( २ ) जगद्देवचरित; ( ३ ) आर्यभ-पर्यटण; ( ४ ) सह्याद्रि.

शोकरसात्मकः ( १ ) विष्णुशास्त्री पंडित; ( २ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर; ( ३ ) कोल्हापूरचे राजे चवथे शिवाजी; ( ४ ) मुरारजी गोकुळदास; ( ५ ) फॉसेट–निधन; ( ६ ) महाराज तुकोजीराव होळकर; ( ७ ) जयाजीराव महाराज शिंदे; ( ८ ) श्रीमद्दयानंदनिधन; ( ९ ) रा. सा. वि. ना. मंडलिक; ( १० ) सौ० डा. आनंदीबाई जोशी; ( ११ ) महाराणी विक्टोरिया; ( १२ ) भाऊराव कोल्हटकर; ( १३ ) हरि महादेव पंडित.

**( २ ) नीतिपरः—**

उपाहासात्मकः—( १ ) पदवीचा पाडवा; ( २ ) मेथाजीची मजलस; ( ३ ) अभिनवधर्मसंस्थापना.

चिंतनपरः—( १ ) दुःखिताचें स्वसमाधान; ( २ ) मधमाशी; ( ३ ) वृंदा; ( ४ ) आर्यमातृविलाप; ( ५ ) दुष्काळागमन.

**( ३ ) प्रासंगिक स्फूर्तीचीं:—**

वीणाकाव्यें:—( १ ) सती; ( २ ) मराठी ग्रंथकारांस प्रार्थना; ( ३ ) कन्यादान; ( ४ ) विजयिनीविजयाष्टक.

चरित्रपरः—( १ ) रिपनवियोग ( २ ) फर्ग्युसनविलाप.

[ यांत पांचव्या गुच्छांत प्रसिद्ध होणाऱ्या काव्यांचा समावेश केलेला नाहीं हें वाचकांस स्पष्ट दिसेलच. ]

---

तिच्यासंबंधानें या चारी गुच्छांतून एवढाच प्रसंगोपात्त उल्लेख आहे, ही गोष्ट मोगऱ्यांच्या मनाची शालीनता दाखवितें.तथापि आर्यावर्तांतील प्रत्येक आधुनिक महर्षीबद्दल वीस पंचवीस वर्षें सारखें तर्पण केल्यामुळें मोगऱ्यांचें कारुण्यसरोवर आटलें असेल ही कल्पनाच असंभाव्य. मोगऱ्यांच्या हृत्पट-लावर ठसलेले प्रियपत्नीजन्य दुःखविकार कोठें तरी पद्यग्रथित झाले असलेच पाहिजेत. परंतु एकंदर पांचही काव्यखंडांचा जो पूर्वप्रस्ताव तिसऱ्या खंडांत आला आहे त्यांत पत्नीवियोगकाव्याचा उल्लेख नाहीं, सबब ही सूचना केली आहे.

३. कै. हरीभाऊंनीं तिसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेंत काव्याचें त्रैगुण्यात्मक वर्गीकरण करून नाद म्हणजे स्वरमाधुर्य, अर्थ म्हणजे शब्दलालित्य, आणि ध्वनि म्हणजे सहृदयांच्या अंतःकरणाशीं समीकरण, हीं काव्याचीं तीन मुख्य अंगें होत असें विवेचन केलें आहे. त्यांच्या मार्मिक निरूपणाला परिशिष्ट जोडणें हें असह्य साहसाचें काम होय. तथापि प्रसंगानुरोधानें दोन तीन मुद्द्यांचें स्पष्टीकरण करणें अपरिहार्य आहे. पहिला मुद्दा काव्यनिर्माणमीमांसेचा, आणि दुसरा ग्रथनकौशल्याचा. वाचकवर्ग भिन्नरुचि असतो, आणि बहुजनसमाजाच्या संप्रदायपरिपाठामध्यें ज्या कविश्रेष्ठांची पुण्यश्लोकनामावळींत गणना होते, त्या सर्वांना प्रत्येक वाचक साभिमान अभिवंदन करील; पण सप्रेम परिशीलन असें एखाद्याचेंच करील. कोणाला ज्ञानेश्वरींतील उपमासागरांत बुड्या मारणें आवडेल; कोणी तुकारामाचे अभंग पाठ करून केवळ ‘देवाचिये चाडे’ देवाला आळवीत बसेल; कोणी पंतांच्या आर्यावृत्त आणि अभिजात आर्येचा शुभमंगल आशीर्वाद मागेल; कोणी सज्जनगडच्या परमहंसाचा अनुवाद करून या निःसार संसारचक्राचा धिक्कार करील; कोणी रंगेल जोशीबुवांप्रमाणें सुख दुःख या भवतंतुवाद्याच्या दोन समरस तारा समजून अनंगरंगांबुधीच्या तरंगीं पोहत राहील. कवीचें जसें गुणवैचित्र्य, तसेंच रसिक वाचकांचें रसवैचित्र्य. ईश्वर एक, परंतु बाह्योपाधींनीं बहुविध; तशीच भक्ताची भक्ति मूलस्वरूपांत एकच, परंतु आवडीनिवडीमुळें विस्तार विविध. सर्व स्थावरजंगम आद्यंत ईश्वरस्वरूपांत लिप्त हें ज्यानें ‘दासबोधां’त सप्रमाण सिद्ध केलें त्या निर्गुणोपदेशकाला पंढरीचा विठोबा त्याच्या विठोबा–वेशांत पाहवला नाहीं.

“ येथें कां रे उभा रामा । मनमोहना मेघश्यामा ।
काय केली शरयूगंगा । येथें वाहे चंद्रभागा. ”

असें म्हणून परमेश्वराच्या युगानुरूप वेषांतराचा त्यानें धिक्कार केलाच. मूर्ति तितक्या प्रकृति याचें हें फळ. आम्ररसाची गोडी साधारणतः एकच; तथापि स्थलविशेष आणि हवापाणी यांच्या मानानें प्रत्येक झाडाच्या फळाच

गोडी वेगळी. तशीच प्रत्येक कवीच्या मनोभूमिकेप्रमाणें त्याच्या काव्यरसाची माधुरी वेगळी, आणि त्यानंतर प्रत्येक वाचकाच्या रुचिभिन्नत्वानें ग्रहणमाधुरी प्रत्येकाला वेगळी. छंदप्रबंध, शब्दमौक्तिकांचें भांडार, अलंकारदृष्टांतांची सामुग्री, आणि मुख्य ध्येयाची कथानुसंधानानें जडणघडण, हें सरस्वतीसेवकाचें चतुरंग दळ होय. या सर्वांवर मेहस्थानीं लेखकाची प्रेमकळा ऊर्फ काव्यविषयाशीं तादात्म्य पाहिजे. चळवळीच्या सामर्थ्याला ज्याप्रमाणें भगवंताच्या अधिष्ठानाचें पाठबळ पाहिजे, त्याप्रमाणें कवीच्या चतुरंगदळाला प्रेमकळेचें अभंग कवच पाहिजे. सुप्रसिद्ध वैदर्भकवि देवनाथ काव्यकळेवरील आपल्या पद्यांत (सवाई) म्हणतातः—

"ज्ञानविचार बहू अवलोकिले, भागवतादिक ग्रंथहि सारे
पद्यपदें अमरादिक पाहुनि भारत आदिक शास्त्रपसारे ।
तर्कविशेष यथार्थगती अतियुक्ति अशा सकळांहि कळांहीं
काव्यकळा विकळा विफळा, एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळा ही ॥
गायन सुंदर सुस्वर कंठहि, तान म्हणे अति ठेवणिची
कर नाचुनि पद ताल धरी बरि सांग वदे गत उंचनिची ।
संस्कृत छंदप्रबंध रची, रुचि दावित ह्या चतुराहि कळाही
काव्यकळा विकळा विफळा, एक नाहिं जरी हृदिं प्रेमकळा ही ॥"

४. श्रीदेवनाथांची कविता व भावना सर्वस्वीं ईश्वरविषयक; आणि त्यांच्या 'प्रेमकळा' या शब्दाचा अर्थ ईश्वराची अनन्योपासना असा होय. पण या शब्दाचा उत्तानार्थ लक्षांत घेतला म्हणजे, उच्च ध्येयाशीं एकतानता जेथें दृष्टीस पडेल तेथें प्रेमकळा आढळेल. मोगरे हे निःसीम स्वदेशभक्त होते; आणि आमरणान्त त्यांनीं स्वदेशाची व त्यांतील नररत्नांची महती गाण्यांत आपल्या सर्व शक्ति एकवटल्या आणि झिजविल्या. जशी त्यांची देशभक्ति जाज्वल्य होती तशीच त्यांची सत्यनिष्ठा प्रबळ होती. त्यांची विद्वद्भक्ति कुढी, पक्षपाती, कठोर अगर आंधळी नव्हती. सुधारक आणि उद्धारक हा वाद त्यांच्या बाळपणापासूनच उपस्थित झाला होता,

आणि त्यांचीं स्वतःचीं मतें सामाजिक सुधारणेच्या तत्कालीन प्रचलित तत्त्वांना पूर्ण अनुकूळ अशीं होतीं. 'आर्यमातृविलाप' या कवितेंत ते बालविवाहाचा निषेध करितात, आणि विष्णुशास्त्री पंडितांवर कविता करून त्यांनीं या कर्त्या सुधारकाचा गौरव केला. यानंतर थोड्याच दिवसांनीं, म्हणजे १८८२ सालीं विष्णुशास्त्री चिपळूणकर वारले, त्यांच्याबद्दलचें मोगऱ्यांचें शोककाव्य कवीच्या मनाची विभूतिपूजावृत्ति आणि पावित्र्य दर्शवितें. तेव्हांचे गुंजीकर, भागवत, वामनराव ओक, हरिपंत पंडित इत्यादि विस्तारांतील लेखकमंडळ सामाजिक सुधारणेला अनकूल होतें; आणि विष्णुशास्त्र्यांचे प्रतोदप्रहार सुधारणेवर फारसे नसत, तरी सुधारणापुरस्कर्त्यांवर विशेष कठोरतेनें पडत असल्यामुळें ते सुधारणाशत्रु होत, असा सर्वत्र समज झाला होता. तथापि उभयपक्षांचे वीर दाक्षिण्यपूर्ण असून आतांचा पक्षभेदाचा व्यक्तिविषयक तीव्रपणा तेव्हां दिसत नव्हता, आणि मृताची सपिंडी करतांना सुहृद् आणि दायाद आपापले भेद विसरत असत. शास्त्रीबुवांबद्दल मोगऱ्यांचे उद्गार फारच प्रेमळ आणि भक्तिपूर्ण आहेत, आणि तेही उभयतांची कधींही गांठ पडली नसतां निघाले असल्यामुळें परस्परभूषणास्पद आहेत.

" नाहीं पाहियलें तुला, परिसिली नाहीं तुझी ती गिरा,
जी त्वच्छिष्यजनांस दे सुख, जशी पीयूषधारा सुरां ।
ठावा मात्र मला पराक्रम तुझ्या त्या लेखणीचा असे—
होते भीत जिला नृपाळहि मनीं सिंहीस जैसे ससे ! १३

× × ×

तारुण्याची न ईच्या तनुवरि अजुनी फांकली दिव्य कांति,
बोलें अद्यापि ईच्या रसिकजनगणश्रोत्रयुग्में न धाती ।
हीच्या कौमारलीला अझुनि सुचविती ही न लज्जादुकूला
त्याली.विष्णो! अशी ही असुनिहि कुमरी कां इचा त्याग केला ? १८

× × ×

ज्यांच्या चेतश्चकोरीं मुदित तव मुखेंदूस पाहोनि व्हावें
तूझें वात्सल्य ज्यांनीं निशिदिनिं शयनीं भोजनीं आठवावें ।
नाचे कर्णांतरंगीं अझुनि तव गिराराजहंसी जयांच्या
त्या त्वच्छिष्यांस जाळूं बघति जणुं शिखा त्वद्वियोगानलाच्या ! २२

याच्या पुढल्याच सालीं ज्यांच्या वेडामुळें सर्व महाराष्ट्र वेडें झालें ते कोल्हापुरचे चवथे शिवाजीमहाराज वारले. त्या वेळेला सर्व देशभर जो कल्लोळ झाला, त्याचें मोगऱ्यांनीं अत्यंत हृदयदावक चित्र रेखाटलें आहे. १८८४ सालीं लॉर्ड रिपनला मोगऱ्यांनीं जो काव्यहार अर्पण केला त्यांतील भक्तिभाव अप्रतिम आहे. त्या काव्यांतील प्रत्येक ओळ उचंबळलेल्या अंतःकरणांतून निघाली असून त्या वेळच्या राष्ट्रनायकांची मनःस्थिति हुबेहुब दाखविते. हिंदुस्थानासंबंधानें पार्लमेंटमध्यें जॉन ब्राइट. फॉसेट व ब्रॅडला यांनीं जो कैवार दाखविला आणि वेडरबर्न यांनीं जी सेवा केली ती लोक अद्याप सकुतूहल स्मरतात. बाकी बरेचसे मोलें रडले गेले, ते सर्व स्मृतिनष्ट झाले. हाच राष्ट्रप्रेमाचा निधि लॉर्ड रिपनांना लाधला. त्यांनीं आल्याबरोबर प्रेस ॲक्ट व अफगाणयुद्ध हीं बंद केलीं, आणि सुशिक्षितांच्या बळावत चाललेल्या राष्ट्रभावनेला त्यांनीं मुत्सद्दीपणानें गोंजारलें. यानंतर दुसऱ्या वर्षी ( १८८५ सालीं ) फॉसेटसाहेब वारले, आणि त्यांनीं पार्लमेंटसभेंत हिंदुस्थानाबदल जी अहर्निशीं सेवा केली त्याबद्दल त्यांचें यथोचित स्तवन करून मोगऱ्यांनीं तत्कालीन हिंदलोकाग्रणींचा अंगुलिनिर्देश केला आहे. फॉसेट व रिपन या जोडीबद्दल जें सुशिक्षितांचें प्रेम होतें त्याचें निर्मळ प्रतिबिंब मोगऱ्यांच्या रसपूर्ण कवितांत दिसतें. सन १८८६ सालीं इंदूरचे महाराज तुकोजीराव आणि ग्वालेरचे महाराज जयाजीराव वारले, त्या प्रसंगांच्या दोन्ही कविता थोडक्यांतच आटोपल्या आहेत. हरिपंत पंडित अथवा चिपळूणकर यांजबद्दलचे उद्गार जितक्या कळवळ्याचे दिसतात तितके या उभयतां राजशार्दूलांबद्दलचे नाहींत. जयाजीराव महाराजांवरील कवितेच्या अखेर मोगरे म्हणतातः—

“ जावे राव तुझ्यासमान मरुनी, गावोनि त्यांच्या कृति
राया ! तत्कुलजां प्रसन्न करुनी ध्यायास जे वांछिती,
यापेक्षांहि विलापपाटव जनां दावोत ते बापुडे !
नाहीं मी शिकलों, रुचेहि न मला, तें गुर्जरींचें रडें. ”

इंदूर-ग्वालेरच्या राजांबद्दल जरी मोगऱ्यांनीं विशेष लिहिलें नाहीं, तरी महाराणी विक्टोरियाबद्दल त्यांनीं जे उद्गार काढले आहेत ते त्या पुण्यापगा राजमातेबद्दल मोगऱ्यांच्या, सर्व हिंदुस्थानच्या, आणि एकंदर जगाच्या मनांत तिच्याबद्दल जी पूज्यभावना होती तिचे यथार्थ द्योतक आहेत. पूज्यपूजा करण्यांत मोगऱ्यांनीं जातगोताचे क्षुद्र विचार आपल्या मनाला शिवूं दिले नाहींत.

५. राजमृतीबद्दल जास्त शोक करण्याला जरी मोगरे गुर्जरी रडें म्हणतात, व राजकुलजांना प्रसन्न करण्याबद्दल नापसंती दर्शवितात, तरी श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकरांच्या मागून मुंजभोजविक्रमांच्या सिंहासनावर बसणाऱ्या महाराजा शिवाजीराव होळकरांना त्यांनीं कविताकुमारीचें कन्यादान केलें. यांत तिळमात्र विसंगतता मानावयाला नको; कारण या प्रभूचा शेवट जरी गोड झाला नाहीं, तरी याच्या अचाट कल्पकतेमुळें आणि अलौकिक बुद्धिप्रभावामुळें याच्या राज्यारोहणकाळीं सर्व राष्ट्रभर जनतेला फार मोठ्या आशा उत्पन्न झाल्या होत्या. महाराष्ट्र सारस्वतांत नूतन सृष्टीचा धाता-दुसरा विश्वामित्र ऋषि-विष्णुशास्त्री यांचें मोगऱ्यांनीं जितकें सप्रेम अभिनंदन केलें त्याहोपेक्षां त्यांनीं १८८७ सालीं सौभाग्यवती डाक्टर आनंदीबाई जोशी वारल्यावर त्यांचें केलें. अहिल्याद्रौपदीपासून तहत राणी लक्ष्मीबाई झांशीवालीपेक्षां त्यांनीं आनंदीबाईला वरची पायरी दिली. इतरांनीं आपल्या स्वतःकरितां मोठेपणा व कीर्ति संपादिली, पण डाक्टर जोशीणबाईची विद्या सर्व भरतखंडांतील स्त्रीवर्गाकरितां, म्हणून ते तिला निःशंकपणें सीतासावित्रीपेक्षां वानितात.

“ जेव्हां प्रश्न परी करील मजला कोणी कधीं,—कीं यशा
गातें संतत ज्यांचिया कविवरीं व्यासादिकींही अशा

आल्या कोण पतिव्रता सुचरिता जन्मास या भारतीं ?
आनंदी ! पहिली तुझीच मजला होईल तेव्हां स्मृती ! ७
झाली गौतमशंकरादि पुरुषांमाझारि रत्नें अशीं
साध्वी तूंच इथें परंतु पहिली जन्मास येशी तशी.
ही अत्युक्ति दिसो दिसेलचि तरी देशाभिमानी जनां;
नेणें मी अभिमानची परि दुजा सत्याभिमानाविना. ” ८

हा उज्ज्वल सत्याभिमान मोगऱ्यांच्या ठायीं पूर्ण वसत होता. या दोन मख्य गुणांमुळें हरिपंत पंडितांसारख्या कविकुंजरानें हा मोगरा दीडतप-पावेतों प्रेमास्पद केला. मोगरेही पंडितांबद्दल कृतज्ञताबुद्धीनें म्हणतातः—

बोलूं काय ! अहो नसोनि बघतां कोणी सखासोयरा
वर्षें षोडश लाभलोभ नसतां कांहीं कशाचा खरा।
जेणें केवळ आपला म्हणवुनी हा सिंचिला मोगरा,
गेला आटुनि काय तो सुरुचिर प्रेमामृताचा झरा ? १८

विष्णुशास्त्री चिपळूणकरांबद्दल मोगऱ्यांनीं फार अभिमानानें लिहिलें आहे, तर शास्त्रीबोवांनीं ज्यांच्यावर आग पाखडली त्या नवीन धर्मसंस्थापक दयानंद स्वामींबद्दल त्यांचें उद्गार त्याहून गौरवाचे आहेत. निःपक्षपाती सत्याची मजल याहून किती जावी ?

६. मोगऱ्यांच्या इतर कविता कांहीं नीतिपर आणि कांहीं फर्ग्युसनविलापासारख्या प्रासंगिक आहेत. त्यांचे ‘अभिनव कादंबरी’ हें भाषांतरवजा काव्य स्वतंत्र छापलें आहे, आणि वृंदा काव्य, जगद्देवचरित, आर्यभूपर्यटण*इत्यादि प्रकरणें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें अपुरीं राहिलीं आहेत. त्या प्रकरणांवरून दिसतें कीं महाकवि होण्याला लागणारे गुण मोगऱ्यांच्या ठायीं पूर्णपणें होते. पण त्यांच्यांत अवश्य तें त्राण नव्हतें. शिकंदराजवळ आर्यपुत्रानें काढलेले वीरोचित उद्गार, शिकंदराचें धीरोदात्त भाषण, हिमाचलाचें

*शिकंदराची स्वारी हें या काव्यापैकींच एक प्रकरण आहे.

वर्णन, स्वभूमिदर्शनलालसा, इत्यादि प्रकरणें फार उत्तम साधलीं आहेत. पण कांहीं उत्कृष्ट शब्द लक्षांत असणें यापेक्षां वाक्यपुंज गुंफण्याचें कसब श्रेष्ठ; त्याहून एखाद्या प्रसंगापुरता काव्यखंड तयार करणें जास्त कठीण; आणि सूक्ष्म व गहन नीतितत्त्वें, अनेक मानवी पात्रें व त्यांचें स्वभाववैचित्र्य, कथासरित्प्रवाहाचें आंदोलन, इतिहास अथवा चालीरीती आणि मनुष्यस्वभाव यांशीं सहकारित्व, इत्यादि सर्वांची प्रमाणबद्ध जोडणी करतां आल्यावांचून महाकाव्य निर्माण होणें दुर्घट. रोज शंभर पन्नास आर्या रचणाऱ्या मोरोपंताप्रमाणें योगासन मांडण्याचें शरीरबळ मोगऱ्यांना नव्हतें; आणि त्यांतच प्रपंचाचे कष्ट. सामर्थ्यदाता परमेश्वर, पण ध्येय उच्च राखणें हें प्रत्येकाचें काम आहे, आणि तें मोगऱ्यांनीं चांगलें केलें. एकंदरींत सर्व कवितांचा समारोप करतांना निष्कर्ष हाच निघतो कीं, प्रेमकळा आणि सत्यनिष्ठा ह्या दोन्ही गुणांमध्यें मोगऱ्यांना निरुपम गति लाधली होती. त्यांची शब्दसिद्धि व वाक्यपरिणती दोन्ही कर्णमधुर आणि चित्तमोहन होतीं. त्यांची वर्णनशैली दांडगी होती. स्वदेशाची आणि सरस्वतीमातेची, अशा दोन्ही सेवा त्यांच्याहातून अखेरपावेतों निस्सीमपणें, निष्कलंकपणें, नेटानें आणि निरपेक्षपणानें घडल्या. पुढल्या जन्मीं त्यांच्याहातून याहून जास्त सेवा घडो. वनश्रीचें वर्णन किंवा निसर्गाचें तत्त्वज्ञान हीं देखील त्यांना अवगत होतीं, पण तिकडे त्यांचा फारसा ओढा नव्हता. यामुळें त्यांच्या योग्यतेंत तिळमात्र अणू पडलें नाहीं. काश्मीरचा राजा झाला म्हणजे तो हैदराबादचा नबाब कां झाला नाहीं म्हणून नाक मुरडणें जितकें हास्यास्पद, तितकेंच कोणा कवीला किती रस सर्कशीच्या घोड्याप्रमाणें नाचवितां येतात हें पाहणें गर्हणीय. ज्याचें जें क्षेत्र असेल त्यांत त्याची सत्ता किती आहे एवढेंच पाहणें रसिकाचें काम आहे. सर्व काव्यरसांत सारखा रंगणारा वामनपंडित एखादाच.

७. रा. सा. मोरमकरांच्यामुळें आमचा आणि मोगऱ्यांचा स्नेह जडला, आणि मोगऱ्यांच्या या चवथ्या कविताकन्येचें दान आमच्या हातून व्हावें ही रावसाहेबांची सूचना आम्हीं मोठ्या आनंदानें स्विकारली. मोगऱ्यांच्या कवितांचा पांचवा भाग यथाकाल प्रसिद्ध होईल, आणि

कालक्रमानें त्यांच्या सर्व कवितांचें एकत्र ग्रथन होऊन एकाच पुस्तकांत त्या सर्व वाचावयाला सांपडतील अशी आम्ही आशा करितों. त्यावेळीं सर्व कविता रचनानुक्रमानें छापल्या जाव्या, म्हणजे बालवयांतून उत्तरवया-पावेतों मोगऱ्यांची लेखनकला कशी परिणत होत गेली याचें पूर्ण प्रतिबिंब वाचकांना दिसेल. तसेंच १८८० पासून मोगऱ्यांची कविता प्रगल्भ स्वरू-पाला पोंचली; तेव्हांपासूनच्या पस्तीस वर्षांत मोगऱ्यांच्या मनोरचनेंत काय फरक पडला, सती जाण्याबद्दलचे त्यांचे विचार पुढें कायम राहिले कीं काय, विष्णुशास्त्री चिपळूणकरांबद्दलचें त्यांचें मत अखेरपावेतों तितकेंच दृढ राहिलें कीं काय; रिपन फॉसेट वगैरे सत्पुरुषांबद्दल त्यावेळच्या पिढीप्र-माणें मोगऱ्यांना जो गौरव वाटत होता तो शेवटपर्यंत टिकला कीं काय;इत्यादि मुद्द्यांवर मोगऱ्यांबद्दलच्या कांहीं आठवणी मुंबईच्या विस्तारमंडळानें प्रसिद्ध कराव्या. पुढें मोगऱ्यांचा लेखसमवाय एकत्र छापला गेल्यास या आठवणींचा फार उपयोग होईल. मनुष्याच्या ध्येयांत अंतर पडलें नाहीं तरी अनुभवांत आणि परिस्थितींत विचित्र अंतर पडतें, आणि त्याची मानसिक उत्क्रांति ज्या दर्जाची असेल त्याप्रमाणें तो आशावादी किंवा मिथ्यावादी बनतो; यासाठीं ही माहिती प्रसिद्ध झाल्यास बरें.

आतां प्रसिद्ध होत असलेला हा चवथा गुच्छ वाचकवर्गानें पूर्वील गुच्छांप्रमाणेंच सप्रेम स्वीकारावा अशी विनंती आहे. याचक कितीही नम्र आणि विनीत असला तरी दरबारी पद्धति न सोडतां त्यानें आपली मागणी केली तर दात्याचें मन लवकर वेधतें; यासाठीं मोगऱ्यांच्या कवितेचा स्वीकार करण्याची विनंती त्यांच्या तर्फे आम्ही कविश्रेष्ठ मोरोपंतांच्या शब्दांनीं करितों.:-

" माझा प्रेमा सुदामा हरिसख दुबळा; शब्दसंदोह जो हे
साधूंपाशीं श्रुतीनें पदर पसरुनी जोडिले स्वल्प पोहे ।
या दीनोपायनातें बुधजनभगवान् प्रीतिनें फार गोडी
आणूनी श्रोतृवक्त्रीं भरिल, बहु दया मानुनी तेहि थोडी ॥"

**अच्युत सीताराम साठे.**

# यंदांचा हिंवाळा !

हिमर्तु न असा कधीं भरतभूमिला जाचला
कधीं न सुमनासि तो निज करीं असा झोंबला ॥
तयें प्रळय मांडिला गमनकालिं या वत्सरीं
जणों भरतभून्नती न खपली तदीयान्तरीं. १
तयें प्रथम शोषिलें मधुर गोखले—पाटला
सुगन्धयुत ज्याचिया विबुध वानिती वाग्दला ॥
यशःपरिमलें जयें दशदिगन्तही व्यापिलें
हिमर्तु–कर त्याचिया प्रथम काळिजा टोंचले. २
सुकोनि जंव पाटला न दिन वीसही लोटले
हिमें तंव दुज्या सुमीं स्वकर तीक्ष्ण ते रोविले ॥
सुवासिक सुकोमल स्फटिक–गौर जो मोगरा
विदग्ध मरहट्ठवागुपवनांत जो साजरा. ३
यदीय कुसुमें नवीं उमलतां क्षणीं झेलिलीं
सहर्ष जनिं हुंगिलीं निज शिरावरी ठेविलीं ॥
सुवास न ढळे जरी दिसति आज कोमेजलीं
मनोहर " फुलें " अशीं ऋतुऋतूंत ज्यानें दिलीं. ४
असा मधुर मोगरा जणुं रसाळतेचा झरा
विनम्र अति लाजरा भजक शारदेचा खरा ॥
जसा मणिगणीं हिरा, कविकुलीं तसा मोगरा
हिमा ! निवटुनी तुवां दुखविलें अम्हां पामरां ! ५
प्रसिद्ध बुध गोखले भरतमेदिनीसेवक
तसाच कवि मोगरे प्रथित शारदाराधक ॥
मनोज्ञ नव वाक्–सुमें बहु जयें जनांतें दिलीं
तया निवटुनी हिमा ! स्थिर अकीर्ति त्वां जोडिली ! ६
हिमा ! न महिमा तुझा उपवनें अशीं नाशितां
अमोघ सुखसाधनें अमुचिं यापरी हारितां ॥
रडे भरतभू जशी रुचिर पाटला शोषितां
तशीच मरहट्ट–वाक् मृदुल मोगरा पाडितां. ७

वि. ज्ञा. वि. मार्च १९१५. गणेश जनार्दन आगाशे.

# प्रकाशकांचे दोन शब्द.

" मोगऱ्याचीं फुलें, गुच्छ चौथा " हें पुस्तक गेल्या वर्षाच्या अखेर वाचकांच्या हातीं पडावयाचें. परंतु त्यास उपोद्घात लिहिण्याचें कै. गंगाधरपंत मोगऱ्यांच्या ज्या मित्रानें कबूल केलें होतें त्यास तें अपरिहार्य अडचणींमुळें पुरें करतां न आल्यानें आमचा निरुपाय झाला. पुढ तें काम रा. मोगऱ्यांचे दुसरे एक सहृदय मित्र, मार्मिक टीकाकार आणि कवि, रा. रा. अच्युत सिताराम साठे, एम्. ए., बी. एल्., यांनीं मोठ्या आनंदानें पत्करून, न्यायदेवतेच्या सेवेंत अंतर पडूं न देतां, अल्पावकाशांत चोख रीतीनें करून दिलें. याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों.

'मोगऱ्याच्या फुलां'च्या तिसऱ्या गुच्छास कै. हरीभाऊ आपटे यांनीं जो सुंदर उपोद्घात लिहिला, त्यांत त्यांनीं कवीचें सविस्तर चरित्र न दिल्यामुळें ते एका टीकाकाराच्या दोषास पात्र झाले होते. परंतु त्या गुच्छांत कवीचें सविस्तर चरित्र देण्याचा हेतु नव्हता,—अगर या गुच्छांतही तें देण्याचा नाहीं. 'मोगऱ्याच्या फुलां'चा पांचवा गुच्छ प्रसिद्ध झाल्यावर कवीचें विस्तृत चरित्र देण्याचा विचार ठरला होता. तें काम गंगाधरपंतांचे पुतणे रा. रा. केशव निळकंठ मोगरे बी. ए. यांनीं अर्धेंमुर्धें पुरेंही केलें होतें. परंतु त्यांच्या अकालिक मृत्यूमुळें तें अपुरेंच राहिलें. तें पुरें करण्याचें काम आतां त्यांच्या दुसऱ्या एका सहृदय मित्रानें कबूल

केलें आहे. त्याबरोबरच कै. गंगाधरपंतांचे कांहीं गद्य लेख आहेत तेही द्यावे असें मनांत आहे.

मोगरे यांच्या एकंदर कवितांचा नामनिर्देश प्रकाशनाच्या कालानुक्रमानें खालीं करीत आहों. यांत कोणास कांहीं फेरफार सुचवावेसें वाटल्यास त्यांनीं ते जरूर सुचवावे अशी विनंती आहे. त्याचा यथाकालीं आणि यथास्थलीं विचार होईल.

| कविता. | गुच्छ. | प्रकाशन-स्थल. |
|---|---|---|
| खरी राजनिष्ठा. | | इंदुप्रकाश, १८ आक्टोबर १८७५. |
| विष्णु परशुराम शास्त्री पंडित. | ४ | ,, ८ मे १८७६. |
| दुष्काळागमन. | ,, | ,, १८ जून १८७७. |
| आर्यमातृविलाप | ,, | स्वतंत्र. प्र. आ. १८७७. द्वि.आ. १८८६. |
| कै. मुरारजी गोकुळदास | ,, | इंदुप्रकाश, २५ आक्टोबर १८८०. |
| फर्ग्युसन-विलाप | ,, | १८८१: वि. ज्ञा. वि. जुलै १८८९. |
| कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर | १ | ' संगीत विष्णुगुणादर्श. एप्रिल १८८२. |
| महाराष्ट्रजनविलाप. | ,, | स्वतंत्र. १८८४. |
| भिक्षुक, शास्त्री, पुराणिक. | | वि. ज्ञा. वि. आगष्ट १८८४. |
| एक स्वप्न—'काका.' | | १८८४. |
| रिपन-वियोग. | १ | वि. ज्ञा. वि. दिसेंबर १८८४. |
| तापसीबाई. | | १८८२ ,, जानेवारी १८८५. |
| आर्यभूपर्यटन ( अपूर्ण ) | २ | १८८४. वि. ज्ञा. वि. १८८६ |
| श्रीमद्दयानंद-निधन. (अपूर्ण) | ४ | १८८३ वि. ज्ञा. वि. फेब्रुवारी १८८५. |
| जगद्देवचरित. ( अपूर्ण ) | ४ | ,, एप्रील, मे, जुलै १८८५. |
| हेन्री-फॉसेट-निधन. | ४ | ,, आक्टोबर १८८५. |
| आर्यप्रदीप ( अपूर्ण ). | ४ | ,, आक्टोबर १८८५. |
| अण्णा किर्लोसकर. | | ,, डिसेंबर १८८५ |

| | | | |
|---|---|---|---|
| मराठी ग्रंथकारांस प्रार्थना. | १ | अभिनवकादंबरी. | १८८६. |
| पुस्तकावर अभिप्राय. | | १८८५. वि. वि. ज्ञा. मार्च | १८८६. |
| तुकोजीराव महाराज होळकर. | ४ | ,, एप्रिल | १८८६. |
| जयाजीराव महाराज शिंदे. | ४ | ,, आगष्ट | १८८६. |
| हर्यक्षाचें व राजाचें वाग्युद्ध. | | ,, आगष्ट | १८८६. |
| हर्यक्षाचें स्वापमानकथन. | | ,, आक्टोबर | १८८६. |
| सौ. डॉ. आनंदीबाई जोशी. | ४ | ,, जानेवारी | १८८७. |
| कन्यादान. | २ | ,, मे | १८८७. |
| माझा संसार. | | मनोरंजन, पुणें | १८८७. |
| वाजीराज्यवियोग. | | ,, | १८८७. |
| कै. विश्वनाथ ना. मंडलिक. | | वि. ज्ञा. वि. जून | १८८९. |
| दुःखिताचें स्वसमाधान. | २ | बालबोध, एप्रिल | १८९०. |
| माधवबागेंतली सभा. | | | १८९१. |
| सती. | १ | वि. ज्ञा. वि. आक्टोबर | १८९१. |
| मधमाशी. | २ | ,, एप्रील | १८९२. |
| नूतन वधूवरांस. | | ५ मे | १८९२. |
| न्या. मू. तेलंगाचें अभिनंदन. | | १८९२. वि. ज्ञा. वि. आगष्ट | १९००. |
| सह्याद्रि. | २ | ,, आक्टोबर | १८९२. |
| विजयिनी-विजयाष्टक | २ | ,, जानेवारीं | १८९८. |
| देव म्हणजे काय ? | | ,, फेब्रुवारी | १८९८. |
| माझें झाड | २ | ,, एप्रील | १८९८. |
| वृंदा ( गृहस्थाश्रम ) | २ | ,, | १८९८-९९ |
| शारदोत्सव. | | ,, दिसेंबर | १८९८. |
| महाराणी व्हिक्टोरिया | ४ | ,, जून | १९०१. |
| भाऊराव कोल्हटकर. | ४ | चरित्र. | १९०२. |
| हरि महादेव पंडित. | ४ | १८८९. वि. ज्ञा. वि. जून | १९०४. |
| पदवीचा पाडवा. | ३ | ,, | १९०२. |
| मेथाजीची मजलस. | ३ | वि. ज्ञा. वि. दिसेंबर | १९०७. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संक्रांतीचा तिळगुळ. | | आनंद, | जानेवारी | १९०८. |
| महाराष्ट्रजनविज्ञापना. | | वि. ज्ञा. वि. | दिसेंबर | १९०९. |
| स्वागतम्! सुस्वागतम्!! | | ,, | दिसेंबर | १९११. |
| आर्यमातृसंदेश. | | ,, | जानेवारी | १९१३. |
| हार्डिंग-जन्मदिनोत्सव. | | ,, | जून | १९१३. |
| मंगलाचरण. | | ,, | आगष्ट | १९१३. |
| नवयुग. | | नवयुग, | नोव्हेंबर | १९१३. |
| अभिनवधर्मस्थापना. | ३ | वि. ज्ञा. वि. | सप्टेंबर | १९१४. |
| राष्ट्रगीत. | | १८८४ ,, | दिसेंबर | १८८५ |
| ,, | | | १६ फेब्रुवारी | १८८७. |
| ,, | | वि. ज्ञा. वि. | जानेवारी | १९१२. |
| राजगीत. | | ,, | ,, | ,, |

वरील यादींत ज्या काव्यांसमोर गुच्छाचा अनुक्रमांक नाहीं तीं अझून प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत, आणि त्यांचा पांचव्या गुच्छांत समावेश होईल, असें समजावें. याबाहेर गंगाधरपंतांची अप्रसिद्ध अथवा कोणत्याही नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली कविता कोणास माहीत असेल तर ती आमचेकडे कृपा करून पाठविल्यास तिचाही पांचव्या गुच्छांत समावेश केला जाईल.

प्रकाशक.

# मोगऱ्याचीं फुलें.

## गुच्छ ४.

### आर्यमातृविलाप.

जीचे नंदन नंदनोद्भवसुखां भोगूनि कंटाळले,
जीला स्वात्मजदुःख पाहुनि सदा चिंतानलें जाळिलें,
जीला कांचनभूमिका म्हणवितां लज्जा मनीं वाटते,—
ती मी आर्यसुतांस आर्यजननी अत्यादरें प्रार्थितें ! १

'वार्धक्यीं मज रक्षितील सुत' ही आशा धरोनी मनीं
प्रेमें वाढविते तयांस जननी कष्टांसही भोगुनी;
मीही त्याच मनोरथें तनय हो ! प्रेमें तुम्हां पाळिलें;
त्याचें आजवरी परी न फळ कां कांहीं मला लाभलें ? २

म्लेच्छांनीं स्वाधिकारोन्नतिसमयिं दिलें दुःख जें फार मातें
त्याचा जों पूर्ण झाला विसर न मजला, तों कसें मत्क्षयातें
संगें घेऊनि दैन्यादिक रिपु सुत हो युष्मदालस्य आलें !—
जेणें स्वीय प्रतापें मम वदन जगीं सर्वथा कृष्ण केलें ! ३

होता आधार ज्यांचा सबल मज, तया पुत्रकीं मत्क्षयातें
केला आरंभ ! आतां हर हर नकळे कोण रक्षील मातें !

ह्यासाठीं काय आलां मदुदरिं सुत हो ? मातृघाता कराया
कां झालां सिद्ध ? येणें उचित अपयशा व्हाल लोकीं वराया ! ४

माझे आंग्लप्रभृति भगिनीपुत्र पाहोनि मातें
वाटे कीं, मी प्रसवुनि वृथा वीस कोटी सुतांतें
झालें वंध्या ! निज मुख जगीं दाखवायास चित्तीं
वाटे लज्जा ! हर हर ! किती भोगिजे म्यां विपत्ति ! ५

विश्वेशानें मदवनिं बहू योजिले भूप, त्यांनीं
केला माझा छळचि ! न दिला न्याय मातें खलांनीं !
झाले राजे असुनि सुत हो काळ ते मत्प्रजांचे !
स्वप्नींही यत्स्मरण घडतां पाप होईल साचें ! ६

झालें आतां अनुचित मला सर्वथा आर्य नाम !
दारिद्र्यानें अढळ रचिलें मत्प्रदेशीं स्वधाम !
ऐश्वर्यानें निजमुख मला दाखवावें न ऐसा
केला आहे नियम ! मज हा पातला काळ कैसा ! ७

होतें कांहीं सुकृत पदरीं त्यामुळें इंग्लिशांचे
हातीं आलें; म्हणुनि दिन हे जाति कांहीं सुखाचे.
नाहींपेक्षां हवन यवनक्रूरकर्मानलांत
होतें मी हो ! मग न उरतें नांव माझें जगांत ! ८

इंग्लंदेनें बघुनि भगिनीदुःख, ती स्वात्मजांतें
प्रेमें पाळा म्हणुनि कथिलें आपुल्यां सेवकांतें.

झाला मातें बघुनि कनकालंकृता लोभ चित्तीं,
तेणें तेही नय विसरुनी लाविती दृष्टि वित्तीं. ९

ऐश्वर्याच्या सुखद तरुचें बीज लावावयातें
होतें जों मी झटत, तंव त्या युष्मदालस्यवातें
केली मातें अटक; म्हणुनी त्यास टाळावयातें
केले म्यांही श्रम, यश परी लाभलें त्या खळातें ! १०

यत्कीर्तीचें श्रवणचि बुधां थोर आनंद देतें,
यच्छौर्याचें कथन करितां चित्त हें थक्क होतें,
यद्भाग्यें मी सतत धरितें हेमगोत्राभिधान,—
त्यांच्या वंशीं उपजुनि तुम्हां कां नसे स्वाभिमान ? ११

मांसाहारें पतन नरकीं होय—ही शास्त्रवाणी
चित्तीं ज्यांनीं सतत धरिली, त्या स्वधर्माभिमानी
आर्यांचे जे सुत म्हणविती सेवुनी मद्यमांसा,
त्यांतें नेत्रीं बघुनि मजला खेद व्हावा न कैसा ? १२

उल्लंघोनी उदधि बुडतें सर्वथा मी तडागीं !
मद्धैर्याचें उडुप फुटलें पुत्र हो जागजागीं !
उद्योगाचें सबलहि नसे शीड, ऐशा प्रसंगीं
तारायाला क्षम मज असे कोण ह्या भूमिभागीं ? १३

कौशल्याच्या उपवनभुवीं युष्मदालस्यदावें
केलें शौर्य प्रकट, मजला तें न वाटे वदावें !

पाहूं जातां स्थिति मज दिसे तीच आतां कलांची;
बुद्ध्या जो घे असुखरुचि त्या का निवारी विरिंचि ? १४
व्यापाराची खटपट असे, ह्यामुळें तो तुम्हांला
स्वीकाराया अनुचित असे ! त्यागुनी आळसाला
कैसें व्हावें प्रिय मग तुम्हां तें कृषीकर्म ?— ज्याच्या
संगें होती विगलित सदा शक्ति त्या आळसाच्या ! १५
'दैवें झालों अधन परि त्या आमच्या पूर्वजांच्या
'ऐश्वर्याचें कथन करितां थक्क होईल वाचा !'—
ऐसी प्रौढी मिरवुनी तुम्हां लाभ तो काय झाला ?
कां हो कांहीं करुनि न कृती दावितां ये तुम्हांला ? १६
गेलें गेलें सकळ म्हणुनी व्यर्थ म्यां खिन्न व्हावें;
मत्पुत्रांच्या कठिण हृदया हें नसे दुःख ठावें.
ज्या ज्या त्यांना सुखकर अशा वस्तु त्या प्राप्त होती
नाना देशांतुनि, मग कशी त्यांस व्हावी विपत्ति ? १७
वस्त्रें त्यांना पुरविन असा नेम मांचेस्टरानें
केला आहे दृढ, म्हणुनि तें नित्य मोठ्या श्रमानें
नानायंत्रीं विविध वसनां निर्मुनी पाठवीतें;
वाटावें हें सुख मज, परी दुःख कां व्यर्थ होतें ? १८
चाकू कात्र्याप्रभृति सगळे सानमोठे पदार्थ
लोखंडाचे, ममतनयहृन्नेत्रसंतोषणार्थ

शेफील्डानें करुनि इकडे पाठवावे स्वहस्तें—
वाटावें हें सुख मज, परी दुःख कां व्यर्थ होतें ? १९

नाना मद्यें बहु रुचिकरें मत्सुतां जीं हवीं तीं
ओपोर्तोचे सदय जनही आदरें पाठवीती.
ऐशा नानाविध सुखकरा वस्तु मन्नंदनांतें
अल्पायासें मिळत असतां कां मला दुःख होतें ? २०

देती वस्तु तुम्हां करोनि जन ते ज्या सर्व ह्या संप्रती,
त्यांचें मोल तुम्हांकडोनि मिळतें किंवा न हो त्यांप्रती ?
ह्याचा जो तुमच्या मनीं भ्रम असे तो दुःख देतो मला !
त्या दुष्टेंच मला सदा तनय हो हृद्रोग हा लाविला ! २१

लोकीं ह्या जरि वस्तु निर्मुनि तुम्हां नानाविधा अर्पिल्या,
त्या त्यांनीं स्वहितार्थची; न तुमच्या कार्यार्थ त्या निर्मिल्या.
द्रव्याचेंच तयां अगत्य, तुमच्या स्वार्थासवें त्यां नसे
कांहीं काज—जरी तुम्हांस म्हणती लोकांत ते मित्रसे. २२

गारा देउनियां हिरे मिळविती ते लोक, हें कां नसे
हा हा ! आजवरी तुम्हांस कळलें ? कां जाहलां मूढसे ?
युष्मत्पूर्वज ज्या धना मिळवितां कष्टें बहू भागले,
तें द्याया परहस्तकीं विषम कां नाहीं तुम्हां वाटलें ? २३

ज्या गौरांनीं निजकृति तुम्हां दावुनी थक्क केलें,
ज्यांनीं युष्मत्सुविमलयशःसागरा रिक्त केलें,

त्यांचे घ्यावे सुगुण; परि हें नावडोनी तुम्हांला
घेतां त्यांच्या सततहि विपद्दायका दुर्गुणांला ! २४
दैन्याग्नीनें जळत असतां दुःख सारोनि मागें,
व्हावें युष्मद्धित म्हणुनि मी भोगितें कष्ट आंगें !
त्याची सर्व स्मृति विसरुनी कां निजालस्यदावें
जाळायाला मजासि सजलां पुत्र हो दुष्टभावें ? २५
इंग्लंदेतें शरण रिघतां नावडे स्वाभिमाना !
मच्छोकाचे ध्वनिहि तुमच्या दुःख देतात कानां !
आतां शोधूं कवण सुत हो अन्य मी स्वावनाला ?
श्रीशाचाही मजवरि असा काय हा कोप झाला ! २६
नाना चेतोहर कृति तुम्हां अन्य ज्या दाखवीती,
त्या कां स्वांगें न करुनि तुम्ही वाढवीतां विपत्ति ?
आलस्याचा अझुनि न कसा वीट ये हो तुम्हांला ?
उद्योगाची रुचि कटु गमे काय युष्मन्मनाला ? २७
विद्याभ्यासीं तनुमनधना अर्पुनी दीर्घकाळें
होतां त्याची अवगत कला, कीर्ति जेणें विटाळे
ऐशा दास्या सतत करितां द्रव्यमोहीं पडोनी !
विद्येला ही खचित रुचते काय हो मानहानि ? २८
जणें सौख्याभिरुचि दिधली पूर्ण खंडद्वयातें,
जचें वास्तव्यंचि बुधजनां सर्वथा शोभवीतें,

जी चिंतेला नुरवि अगदीं,—त्या विपन्नाशिनीला
युष्मत्संगें अनुचित यशोभंग हा प्राप्त झाला ! २९

ज्या विद्येचें यश हरतसे अर्पितां स्वस्वसांतें,
ह्यासाठीं तन्मधुररुचिचा लाभ द्याना तयांतें;
त्या विद्येचें सुयश न कसें दास्यदावीं जळावें ?
कां हो झालें अझुनि तुमच्या अंतरा हें न ठावें ? ३०

वैधव्यानें अमित तुमच्या नाडल्या ज्या स्वसा, त्या
दुःखाक्रोशें विनाविति तुम्हां स्वाग्रजां दुःखहर्त्यां;
त्यांच्या कां हो न करुनि तरी अश्रुसंमार्जनातें
सुग्रासाच्या इह न तुम्हि कां देतसां भोजनातें ? ३१

अन्योन्यांचे नुमजुनि मनोभाव जों बाल्य नाहीं
गेलें, तों कां निजसुतसुता योजुनीयां विवाहीं
भावी दुःखानलिं हवितसां त्यां तुम्ही ह्या प्रकारें ?
केव्हां शुद्धीवर तरि तुम्ही याल हो सद्विचारें ? ३२

परोपकृतिसारखा त्यजुनि धर्म, नाना मतें
उपस्थित करोनियां सतत वैरदावाग्नितें
प्रदीप्त करितां तुम्ही; कृति कशी जगत्पालका
रुचेल सुत हो अशी प्रणतपातकक्षालका ? ३३

आतां एकचि सांगतें गुज तुम्हां मी आपुलें पुत्र हो !
तें घ्या ऐकुनि ! सर्वथा न तुमचें दुर्लक्ष तेथेंहि होः—

उद्योगांकुश ध्या करीं प्रभुवरा प्रार्थूनियां आदरें !
हें नाहीं तरि आत्मघात करितें मी पुत्र हो सत्वरें ! ३४

भो भो श्रीजगदीश्वरा ! गुणनिधे कारुण्यसिंधो ! तुला
प्रार्थीं मी करुणस्वरें सतत कीं रक्षीं सदा तूं मला !
उद्योगांकुश दे मदात्मजकरीं तूं नित्य विश्वंभरा !
जेणें ते करितील शासन तया आलस्य-रात्रिंचरा ! ३५

ऐक्याद्रीच्या सुगम शिखरीं स्वाभिमानालयातें
बांधोनीयां मम सुत कधीं मत्सुभाग्योदयातें
आनंदानें बघतिल ?—अशी जी मला थोर चिंता
तीतें केव्हां हरिल नकळे विश्वसंतापहन्ता ! ३६

जीणें कष्टें मज रिपुभयापासुनी सोडवीलें,
जीच्या पुत्रीं मदवनिं बहु स्वास्थ्यही आटवीलें,
ती इंग्लंदा मजवरि करो राज्य सप्रेममोदें !—
ही त्या ईशा सतत विनति क्षेम विश्वास जो दे ! ३७

# विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांचा मृत्यु.

जन्म १८२७; मृत्यु २९ एप्रिल १८७६.

व्हावें कठोरचि सदा त्यजुनी दयेला
मृत्यो ! अशा करुनियां दृढ निश्चयाला
कां रे सदा हरिसि तूं असु सज्जनांचे ?
आदेश हेच तुज काय दयाघनाचे ? १

विष्णूस नेउनि किती तुज लाभ झाला ?
झाली समृद्धि किति सांग तुझ्या यशाला ?
अत्यल्प लाभ नसतांहि, तुला प्रयत्नें
नेतोसि कां हरुनि विष्णुसमान रत्नें ? २

वैधव्यदुःख हरुनी विधवा स्त्रियांचें
द्यावें तयां सुख, मनोरथ हे जयाचे
कैसी तया परशुरामसुतास नेतां
आली दया न तव थोर कठोर चित्ता ? ३

हिंदूंस वा सतत दुःखचि भोगवावें,
सौख्योपभोग बहु दुर्मिळ त्यांस व्हावे,

ऐसी स्पृहा धरुनि अस्मदुदार लोकां
नेऊनि लाविसि अम्हां करण्यास शोका ! ४

विष्णूशिवाय नगरी तव रिक्त होती
या कारणास्तव अशी कृति दुःखदा ती
केली तुवां अवगणोनि परोपकारा ?
कर्में अशा तुज हंसो तव लोक सारा ! ५

केलें कसें बहु तुवां विपरीत काळा ?
आला कसा द्रव न लेश तुझ्या मनाला ?
वैधव्यदुःखदहनीं विधवाजनांतें
पाहोनि केविं सुख होय तुझ्या मनातें ? ६

कां विष्णुच्या कृति तुलाच असह्य झाल्या—
सुज्ञांनिं ज्या परम उत्तम मानिलेल्या ?
सर्वांस संमत तयास न मान द्यावा
ऐसाच काय तव निश्चय मृत्युदेवा ? ७

मृत्यो ! तुला भजति जे बहु नम्रतेनें
देशी तयां असुख नित्य कठोरतेनें !
उन्मत्त होउनि तुला भजती न, त्यांतें
ताडावया अबल तूं निजपाशघातें ! ८

मृत्यो ! असो परि तुवां न कधींहि आतां
ऐशापरी दुखविजे मम आर्यमाता !

हीं भस्म होय निजपुत्रवियोगदावीं
ऐसें कठोरपण ह्याउपरी न दावीं ! ९

निजजनविरहाचें दुःख आहे अपार;
परि तव भय दुःखाहूनि मानूनि फार
द्रवशिल म्हणुनी ह्या पद्यसूक्तावलीनें
विदित तुजचि केलें दुःख **गंगाधरानें** ! १०

८ मे १८७६ ] एक विद्यार्थी, एल्फिन्स्टन हायस्कूल.

# दुष्कालागमन.

अंभोवृष्टि महीवरी न करुनी जीमूत जो जाहला
व्रीदत्यक्त असेंच मानुनि मनीं जो भृत्य आज्ञापिला
काळें ही असहाय आर्यजननी भक्षावया संप्रति-
दुष्काळा अससील तूंच बहुधा तो पातकी दुर्मति ! १

नेत्रीं नाणुनि बाष्पतोय तुजला संतोषवाया जरी
टाकी नित्य निजार्भकाहुति तुझ्या क्षुत्पावकाभ्यंतरीं
ही माझी जननी, तरी निजमनीं जें भोगिते दुःख ती
तें ज्याला समजेल पूर्ण शतधा होईल त्याची मति ! २

राजाज्ञा तुजला असे, म्हणुनियां तूं मुक्त होसी कसा
दोषांतून सुदुःखद स्वकृतिचा लावूनियां आरसा ?
तूझी तत्परता परासुहरणीं पाहूनियां प्रेषितो
राजा नित्य तुलाच ! दोष तुजला हा सर्वथा लागतो ! ३

वर्षें चार न पूर्ण होत इतुक्यामध्यें पुन्हां तस्करा
दुर्भिक्षादिक मित्र घेउनि सवें ह्या आर्यभूमंदिरा
न्याया प्राणधना हरोनि तुजला यावें कसें वाटलें ?
चोरा ! त्वत्कृति पाहुनी हृदय हें दुःखें द्विधा जाहलें ! ४

एकामागुनि एक भाग वदनीं ह्या आर्यभूचा खला !
कां रे घालुनि हीनसत्त्व करिसी ? कोणीच नाहीं तुला

वारायास समर्थ एक जलदावांचून लोकत्रयीं—
ऐसें मानुनि काय यत्न करिसी ह्या आर्यभूच्या क्षयीं ? ५

दुष्काळा! विलयास आर्यजननी नेवोनियां विक्रमें
तूतें होइल हर्ष फारचि ! परी तूं शेवटीं ह्या क्रमें
पश्चात्तापचि पावशी ! न मिळुनी भक्षावया तूजला
कां कीं शांत तुझी क्षुधा करिलसा नाहीं दुजा जन्मला ! ६

केला दक्षिण देश निर्जन तुवां साराच कीं रे खळा !
आक्रोशें रडती प्रजा सकळ ह्या होऊनियां दुर्बळा !
दुष्काळा! बळ दाविसी किति असो धिक्कार तूझ्या बळा !
काळें तोंड करूनि जा पुनरपी येऊं नको भूतळा ! ७

वापी निर्जल जाहल्या, न उरला आडामधें थेंबही
पाण्याचा! अगदींच कुंठित पहा झाले स्रवंत्यौघही !
कष्टें शोधुनि पाहतांहि न वनीं काडी तृणाची मिळे !
वृक्षीं पल्लव राहिला न बहुधा त्वत्क्रूरदृष्टीमुळें ! ८

व्हावी शांत तृषा म्हणूनि पशु हे दुःखें शिला चाटिती !
कांटे भक्षुनियां क्षुधा शमविती, जिव्हा जरी फाटती !
अस्थीपंजर मात्र एक उरला ह्यांच्या शरीरीं पहा !
दुष्काळा! अझुनी तुला न समजे कैसा त्वदन्याय हा ? ९

पौरांचे समुदाय ज्या उपवनीं हर्षोत्करें क्रीडले,
जेथें दिव्यफलोद्गमीं तरुवरीं नम्रत्व संपादिलें,

गालीचासम शोभल्या बहु जिथें पुष्पागमीं वाटिका,–
दुष्काळा! दिधला अशा स्थळिं कसा त्वां वास त्या खाटिका? १०

ज्या ज्या दिव्यपथीं स्ववैभव रथीं बैसोनियां दाविलें
ऐश्वर्यांधजनीं अनेक समयीं पौरव्रजां, राहिले
त्यां त्यां माजि भुजंग वास करुनी वाताशनें संप्रति
दुष्काळा बघतांच ही स्थिति मनीं उत्पन्न होते क्षती ! ११

ज्यांच्या पुण्यतटीं सुनिर्मल मनें घालुनि पद्मासनें
केल्या अर्पण आहुति द्विजवरीं स्वाहास्वधानिस्वनें
तीन्ही काल हुताशनांत विधिनें, त्या पुण्यनीरापगा
झाल्या केविं वसावया उचित बा गृध्रादि दुष्टां खगां ! १२

जेथें टाळ मृदंग घोष करुनी सप्रेम रंगांगणीं
होते नाचत भक्त भाविक सदा भाळीं बुका चर्चुनी,
चोरांचे समुदाय निर्भय पहा आतां तिथें राहती !
दुःखें ढाळिति अश्रु ते टपटपां जे ही स्थिती पाहती ! १३

नासाग्रीं लय लावुनी धरुनियां रुद्राक्षमाला करीं
होते तापसवृंद संतत जिथें तल्लीन विश्वंभरीं,
ऐशा गोमयलिप्त पर्णकुटिंहीं आतां शिवा राहती !
दुःखें ढाळिति अश्रु ते टपटपां जे ही स्थिती पाहती ! १४

अन्नावांचुनि सोडिती पटपटां प्राणासही बा किती !
कष्टें होउनियां तृषार्त उदकासाठीं किती हिंडती !

जाती सोडुनियां स्वदेशहि किती टाळावया आपदा !
हा हा वक्ष पिटूनि पूजिति किती साक्रोश देवी क्षुधा ! १५

अंकीं खेळविलीं करें कवळिलीं हर्षोत्करें चुंबिलीं,
प्रेमें वाढविलीं अनेकसमयीं प्राणापरी रक्षिलीं,
ऐशीं कोमल बालकें त्वदुदरीं अर्पूनि मातापिता
निर्वाहार्थ वनोवनीं भटकती भक्षीत शुष्का लता ! १६

झाली त्वत्कृति जों नसे विदित त्या सौदामिनीच्या वरा
दुष्काळा ! इतक्यांत जा त्यजुनि तूं ह्या आर्यभूमंदिरा !
चांडाळा ! जरि ह्यापुढेंहि त्यजिसी हेका न तूं आपला,
प्रायश्चित्तचि निश्चयें स्वकृतिचें घ्यावें पडे बा तुला ! १७

इंदुप्रकाश, १८ जून १८७७.]

# मुरारजी गोकुळदास.

जन्म २९ आक्टोबर १८३४ ] [ मृत्यु १६ आक्टोबर १८८०

रत्नाचे असती असंख्य जरि ह्या भूमंडळीं पारखी,
काळा ! कीर्ति नसेच रे पसरली त्यांची तुझ्यासारखी !
कोणीही निवडील ते जडमणी—आश्चर्य कांहीं नसे;
लागे पारखितां परी नृमणिला चातुर्यची फारसें ! १

काळा ! शोक किती तरी करिल ही आर्यप्रसू आमची !
देशी घेउनि कां हिला न अगदीं सौख्यामृताची रुची ?
मागावीं नवसूनि विश्वपतिला जीं पुत्ररत्नें हिनें,
न्यावीं चोरुनि हाय तीं किति तरी त्वां विश्वनिकृंतनें ! २

पूर्वी विष्णुमणी[1] हरोनि करणी त्वां क्रूर केली जनीं,
तीचें दुःख नसेच जों विसरली ही आर्यभू-भामिनी
तों दुष्टा इतक्यांत धाड पडली तूझी गणेशोवरी[2] !
तेणें धैर्यतरू हिचा उलथुनी खालीं पडावा; परी— ३

आशा बाळ मुरारिची बहु मनीं होती, म्हणोनी तया
दुःखें थोर करोनि दूर सजली टेंका पुन्हां द्यावया;
तेंही नावडलें तुला म्हणुनि ह्या घोर प्रसंगांतही
येशी दुखःचि द्यावयास करणी बा चांगली काय ही ! ४

१ विष्णुशास्त्री पंडित. २ गणेश वासुदेव जोशी ऊर्फ 'सार्वजनिक काका.'

काळा ! काय मुरारिवांचुनि पुरी होती तुझी ओस ती ?
किंवा सज्जनमारणांतचि तुझी आनंद मानी मती ?
कीं ही आर्यमहीच होय बहुधा दुर्भागिनी ?—त्यामुळें
ऐसें रत्न तिला अयोग्यचि असें त्वां मानिलें रे खळें ? ५

कीं दुष्काळदवानळांतुनि जनां काढोनि त्यानें तुला
पूर्वीं पाठविलें निराश, म्हणुनी त्वां सूड हा घेतला ?
बा रे सूड तुझा तुवां उगविला ! ह्या ाम्उलीला परी
दुःखाचा पडला कडा उलथुनी वाटे निजांगावरी ! ६

दुर्वार्ता ही अकस्मात् श्रवण करुनियां दुःख ज्याच्या मनासी
नाहीं होणार ऐसा कवण नर असे ह्या महाराष्ट्र देशीं !
धैर्यप्रासाद खालीं न कळत पडला कोसळोनी स्वकीय—
ऐसें वाटोनियां ते असतिल करित स्वाननें हाय हाय ! ७

'या या बांधव हो ! निराश अगदीं होऊं नका अंतरीं !
'माझी कास धरा, तुम्हां चढवितों ऐश्वर्यदुर्गावरी !'
ऐशी भाक दिली स्वबांधवजनां त्वां जी मुरारे ! तिला
आतां पूर्ण करावयास दुसरा बा कोण रे राहिला ? ८

कद्रूच्या दास्यबंधांतुनि निज जननी सोडवी पन्नगारी,
तैसा दारिद्र्यबंधांतुनि करिल मला मुक्त माझा मुरारी—
ऐशी ही आर्यमाता सतत धरुनियां स्वांतरीं थोर आशा
हर्षें मोजीत होती दिवस; तंव पुढें पातली कर्मरेषा ! ९

आशा त्या माउलीची सफल न करितां, आपल्या बांधवांतें
लोटोनी दु:खडोहीं उचित तुज कसें वाटलें जावयातें ?
कीं ह्या दुर्भागिनीचें हित करुनि बहू बांधवा! भागलासी,
ध्याया विश्रांति वाटे म्हणुनि यमपुरा तीस सोडोनि जाशी? १०

मातेचा प्रतिपाळ सोडुनि तिला जातां **गणेशें** तुला
होता सोंपविला, परी न रुचलें तें त्या कृतांता खळा!
आतां भार तुझा तुवां निरविला ज्या मातृभक्ता, तया
विश्वाधीश करो चिरायु अमुची आणोनि चित्तीं दया! ११

# श्रीमद्दयानंदनिधन.

जन्म—सं. १८८१ ] [ मृत्यु--सं. १९३९

## श्लोक.

हा ! हा ! त्या गाणपत्यीं गणप नवसिला काय तो विघ्नकर्ता ?
कीं त्या कापालिकांनीं खडतर नियमीं प्रार्थिला मारहंता ?
शाक्तत्राणार्थ किंवा त्रिनयन-ललना धांवली क्रूर काली ?
कीं कोणी कृष्णलीलामधुमधुकर ही भीड शौरीस घाली ? १

कीं बौद्धीं प्रार्थिलें त्या परमशुचियशःसिंधु सर्वार्थसिद्धा—
अज्ञानध्वांत ज्यानें हरुनि निवटिलें धर्ममार्गा अशुद्धां ?
कीं चिंताग्रस्त जैनां निरखुनि चढला कोप तीर्थंकराला ?
कीं शिष्यीं नानकाच्या निजगुरुकडुनी सूड हा घेववीला ? २

किंवा सारे स्वतांचे कळप तुजमुळें क्षीण होतील काळें,
ह्या भेणें कृत्य काळाकडुनि करविलें हें कुणीं मेंढपाळें ?
किंवा स्वामी ! परींची मृगजलसम तूं भासवीलीस सृष्टि
कोण्या पैगंबराची, म्हणुनि तुजवरी होय ही वक्र दृष्टि ? ३

कीं कोणा चेटक्यानें प्रकट करुनियां दाविली ही स्वमाया ?
कीं कोणीं योगिनी त्या स्तवुनि वळविल्या दुष्कृती ही कराया ?
किंवा हालाहलाचें तुजसि करविलें पान कोणीं शठानें ?
केलें अल्पायु तूतें प्रथमचि अथवा त्या विधीनें हटानें ? ४

भ्रांतिग्रस्त समस्त होत बहुधा ह्या सर्व मत्कल्पना;
शोकें विव्हल होउनी बरळतों जें वाटतें तें मना.
ऐशीं कल्पित दैवतें पुरवितीं इच्छा जनांच्या, तरी
कोठेंही नसताच ठाव उरला आशेस ह्या भूवरी. ५

आम्हीं स्वाराध्य देवांकडुनि करविली ही कृती, हें सुखानें
कोणी मानोत; त्यांचें मजसि न वदवे शील माझ्या मुखानें.
मानीं मी एक—कीं ह्या भरतजनपदोद्धारणार्थ प्रयत्नां
जे जे जाती कराया, अदय विधि यश सर्वथा दे न त्यांना! ६

हा दैवा! अपराध काय इतुका ह्या आर्यसूचा तुला
आला आढळुनी, सदैव म्हणुनी दुःखेंचि देशी हिला?
जेथें सांठवुनी पुरा नवनिधी सानंद तूं ठेविशी?
दुःखाचे ध्वज आज तूंच तिकडे कां रे विधे रोविशी? ७

अष्टैश्वर्यें सतत वसलीं त्वत्प्रसादेंचि जेथें,
आपद्वृक्षां हरहर विधे रोपिसी तूंच तेथें!
त्वां ज्या स्थानीं बहुविध पुरा खेळ केले सुखाचे,
दैवा! आतां निशिदिन तिथें हा विपत्संघ नाचे! ८

पूर्वी मानुष्यरत्नें उपजवुनि तुवां स्थान जें गौरवावें,
तेथें पाहोनि आतां नृमणि उपजतां कां तुला दुःख व्हावें?
हो दुःखी तूं सुखानें! वश करुनि परी त्या महाक्रूर काला
कां अस्मद्बांधवांचे असु हरुनि वृथा दुःख देसी अम्हांला? ९

रात्रंदिनीं नवसितां जगदीश यत्नें,
संप्राप्त आर्यजननीप्रति पुत्ररत्नें
होतात जीं, न कळतां हरितां तयांला
वाटे न लाज न कळे तुज केविं काळा ! १०

अरे काळा आहे विदित मज तूं शूर अससी;
परी तूं शौर्याच्या विहित उपयोगा न करिसी !
हराया दीनाचें भय उचित तें शौर्यचि कसें
अनाथांतें द्याया भय सतत तूं योजिसि असें ? ११

स्वशौर्यातें काळा ! मिरवुनि **दयानंद**निधनीं
वृथा शोकावर्तीं बुडविलिस तूं आर्यजननी !
अरे क्रूरा ! हीला सुतविरहवन्हींत हवुनी
कसें ध्यावें वाटे तुजसि निजनेत्रां सुखवुनी ? १२

विद्युत्पातें गिरीचे धडधडुनि कडे कोसळोनी पडावे,
किंवा झंझासमीरें कडकड विटपी मोडुनी शीघ्र जावे,
स्वामी ! त्वन्मृत्युयोगें धृतिनगहि तसा आर्यसूचा पडाया
पाहे; आशा परंतु प्रकटुनि करित्ये यत्न त्या सांवराया. १३

शांतीचा अवलोकितांच गमली जी प्रेक्षकां आरसा,
झाली जीवरि आपला उठविती गंभीरताही ठसा,
ज्ञानाचीहि वरी निरंतर जिच्या स्पष्ट प्रभा फांकली,
स्वामी ! मूर्ति तुझी कृतान्तपटलें झांकूनि ती टाकिली ! १४

गोडी फार सुधारसाहुनि जिच्या ठायीं स्वभावें वसे,
शत्रूच्याहि मनावरी न चुकले जीचे उठाया ठसे,
वाहे निम्नसरित्प्रवाहसम जी विद्वत्समाजीं सदा,
स्वामी! त्या पुढती तुझ्या रसवती वाणीस ऐकूं कदा? १५

द्याया जीस पराजयास न शके कोणीही वाक्संगरीं,
युक्तायुक्तविचारणेविण दुज्या शस्त्रा न जी वापरी,
योजी जी समयानुरूप विविधा युक्तिप्रयुक्तींप्रती,
पावे काय तुझ्याबरोबर लया तीहि त्वदीया मति? १६

तें गांभीर्य तुझें पडेल पुढती दृष्टीस आतां कसें?
तें सौजन्यहि धुंडितां सकलही पृथ्वी न कोठें दिसे!
गेलें तें समयावधानहि कुठें सोडूनियां ह्या जगा?
त्याचा शोध कळे न यास्तव रडे ही आर्यसू दुर्भगा! १७

जेणें दुस्तर संकटांत तुजला निर्दोष संरक्षिलें,
ज्यायोगें कठिण प्रसंग सगळे त्वां तुच्छसे लक्षिले,
विद्वत्तेहुनिही विशेष तुजला जेणें अलंकारिलें,
तें लोकोत्तर धैर्य संप्रति तुवां कोणा स्वशिष्या दिलें? १८

जीच्या साम्यास पृथ्वीवर नच दुसरी एक पृथ्वीच आहे,
त्वद्भार्या होउनी जी तुजजवळि—मला वाटतें—नित्य राहे,
शत्रूंचाही तुझ्या जी सहज करुनियां मंद आवेश टाकी,
गेली स्वामी! अहा ती निघुनि तुजसवें शांतिही काय नाकीं? १९

जें संसारसुखाहुनी बहु **दयानंदा** ! तुला आवडे,
ज्याचें तेज विलोकितांच गळुनी षट्शत्रुसंधा पडे,
जेणें ज्ञानधनास देउनि तुझी केली प्रगल्भा मति,
स्वामी ! सांग कुठें लपूनि बसलें वैराग्य तें संप्रति ! २०

जे कोणी भूषवाया झटति निज तनु स्वर्णरत्नादिकांनीं,
लज्जेनें मान खालीं निरखुनि तुजला घालिजे शीघ्र त्यांनीं;
विद्यातेजामुळें त्वत्तनुच न वरिती जाहली तीहि छाटी
शोभा जी, ती न द्याया शकतिल इतरां भूषणें लक्षकोटी ! २१

संन्यासी काय थोडे विचरति धरुनी दंड लेवूनि छाटी ?—
धंदा ज्यांचा करावी भटकत फिरुनी अन्नसत्रांत दाटी !
ऐशा या दांभिकांनीं बुडवुनि सगळे लोक मोहांधकारीं,
हा ! हा ! नानाप्रकारीं भरतजनपदा मात्र केलें भिकारी ! २२

कोठें पोट भरे न यास्तव रुचे संन्यासदीक्षा जयां,
ज्ञानाचा लवलेशही न शकती अन्यांसि जे द्यावया,
त्यांनीं मात्र घरोघरीं भटकुनी अज्ञान नारीनरां
ढोंगें दाखवुनी अनेक भरुनी घ्यावें स्वकीयोदरा ! २३

भयें उद्योगाच्या हरहर ! वृथा हे मळमती
सुखां संसाराच्या त्यजुनि परमार्थाहि मुकती !
अशा शिष्यांतें जे गुरुहि उपदेशास करिती,
अहा ! तेही त्यांच्यासह नरकवासास वरिती ! २४

तूझी संन्यासदीक्षा कलुषित न कधीं जाहली ह्या प्रकारें;
तीचे उद्देश तीनें अकपट करुनी दाविले सिद्ध सारे.
विद्येनें शुद्ध आधीं निजमति करुनी, नंतर ज्ञान द्यावें
अन्यां, संन्यास हेतुद्वय निजहृदयीं नित्य हें त्वां धरावें. २५

दावीना जो निजांगें करुनि वदतसे ज्यापरी स्वाननानें,
व्याख्यानें होत त्याचीं बुधजन म्हणती शुद्ध गंधर्वगानें.
शुद्धाचारेंच त्याच्या सकळ वळविलें विश्व **बुद्धा**कडे त्या;
एका शुष्क प्रलापें कृति घडुनि अशा काय येणार होत्या? २६

स्वामी! तूंहि तसाच वर्तसि जनीं जैसा स्वयें बोलशी;
होती त्याविण पात्र ती तव गिरा लोकीं महत्त्वा कशी?
वाणीलाच्च तुझ्या न केवळ सदाचारासही मोहुनी
राज्यस्थानपती नमीत तुजला होते उभे राहुनी! २७

[ अपूर्ण. ]

कि. ९.२५ १८७८ ७०५१९३६ ५.५२

नगर वाचनालय सातारा



# महाराज तुकोजीराव होळकर.

जन्म सुमारें १८३४.] [मृत्यु १७ जून १८८६

## आर्या.

**विक्रमभोजां**मागें तत्सम जेणें स्वकीर्ति गाजविली,
साजविली **मालवभू**, स्वयशें चंद्रप्रभाहि लाजविली; १
श्री श्रीधरास तैशी राज्यश्री धन्य होय ज्या वरुनी,
पाहोनि ज्या उदारा लज्जित व्हावें अनेक सुरतरुंनीं; २
करुनी प्रजाजनावन धर्मन्यायें जनव्यथा हरुनी,
जो भासवी जनां कीं, पुढती ये धर्मराज अवतरुनी; ३
जेणें **इंदूर**पुरी सुरनगरीसम करून दाखविली,
सल्लालनें प्रजांना माय **अहल्या**हि आठवूं न दिली; ४
सप्रेम वाग्वधूनें करित असावें जयापुढें नृत्य,
झुंडीहि पंडितांच्या धांवत होत्या जयाकडे नित्य; ५
गुणिजन परत न आला रिक्तकरें ज्यासमीप जाऊन,
कविवर वरीत होते बहु सुख ज्याचें चरित्र गाऊन; ६
विद्याकलाकुशलता पावुनि ज्याच्या कृपामृता फळती,
दारिद्र्यदुःखवार्ता ज्याच्या राष्ट्रा त्यजोनियां पळती; ७
शरणागतांस पाहुनि वारिदसा जो दयानिधि द्रवला,
अर्थिमनोरथकल्पद्रुम फलभारें सदैव जो लवला; ८

लक्ष्मी सरस्वतीही सोडुनि अन्योन्यवैरभावास
हर्षें करीत होत्या संतत ज्याच्या समागमें वास; ९
लवही विवेकपर्वत षड्रिपुचक्रास जो न हालवला,
मालवदीप अहा ! तो आज **तुकोजी** नृपाळ मालवला ! १०
जों जों रडत बसावें तों तों मागेंच लागतो शोक,
ऐसें सांगत संतत आले आहेत जाणते लोक. ११
अवकाश त्यांत नाहीं, काळहि कामास लागला सारा;
म्हणुनी शोक पुरा हा करितों गाळून आसवें बारा. १२

# जयाजीराव महाराज शिंदे.

जन्म १८३५] [मृत्यु २० जून १८८६

## श्लोक.

'इंदूरेश्वर पावला मरण' हें ऐकोनि जीं ढाळिलीं
बाष्पें, तींहि महीतळीं पडुनियां नाहींत जों वाळलीं,
जावा तोंच यमालयास निघुनी **ग्वाल्हेरचाही** पती !—
ह्यापेक्षां छळ आमचा अकरुणें दैवें करावा किती ? १

वर्षें शंभर चालवून वडिलीं ज्या घोर वैरव्रता
अन्योन्यार्थ दुराग्रहें नवसिली देवी पराधीनता,
तद्बंगें उभयांस दोष नुकता राया **जया** ! जो घडे,
तच्छुद्ध्यर्थ तुम्हांस काय करणें ही स्वर्गयात्रा पडे ? २

कीं जो दुर्लभ सख्यलाभ घडला **माहेश्वरीं** एकदा,
गेले प्राण तरी वियोग सहसा त्याचा न व्हावा कदा,
झाला हा पहिलाच काय तुमचा संकल्प राया **जया** !
मित्रामागुनि शीघ्र तूंहि म्हणुनी गेलास दिव्यालया ? ३

कीं ज्या तूं मुकसी स्वपूर्वजयशस्तंभा **जयाजी** नृपा !
येतां दुर्गम दुर्ग तो निजकरीं होऊन दैवी कृपा,
इच्छापूर्ति घडे, कलंकहि झडे, सत्कीर्ति मागें पडे—
प्राणत्याग म्हणून काय तुजला हा राजया ! आवडे ? ४

किंवा जन्म जगज्जयक्षम महावीरान्वयीं घेउनी
नाहीं गाजवितां पराक्रम तुला कांहींच आला जनीं,
राहे झोंबुनि तीक्ष्ण शल्य हृदया हें जें तुझ्या राजया !
त्वत्प्राणास तयेंच काय हरिलें हृद्रोग लावूनियां ? ५
किंवा दिल्लिपतीसमान नृपही ‘ जी जी ’ म्हणोनी जयां
होते प्रार्थित आपणां रिपुभयापासून रक्षावया,
तद्वंशीं उपजोनि जीव धरितां अन्याश्रयें स्वांतरीं
आला वीट, म्हणून काय करिशी संसारयात्रा पुरी ? ६
किंवा वर्षचतुष्टयांस चवघां राजर्षभांचे बळी
जीणें घेउनि आर्यभू सकल ही शोकार्णवीं लोटिली,
भोंवे दुःसह दुर्दशाच तुजला ती आमची काय रे ?
वाटे त्वन्मरणास कारण दुजें ह्यावीण नाहीं खरें ! ७
यावी जी न घडूनियां घडविली ती दुर्विधीनें कृती,
आतां काय रडोनि अर्थ ? मज हें माझीच सांगे मती;
मायामोह परी अनावर मना होऊन गेल्यामुळें
आपोआपचि बाष्पपंक्ति नयनांपासूनियां ही गळे ! ८
जावे राव तुझ्यासमान मरुनी, गावोनि त्यांच्या कृती
राया ! तत्कुळजां प्रसन्न करुनी ध्यायास जे वांच्छिती,
ह्यापेक्षांहि विलापपाटव जनां दावोत ते बापडे !
नाहीं मी शिकलों, रुचेहि न मला, तें गुर्जरींचें रडें ! ९

# रावसाहेब
# विश्वनाथ नारायण मंडलिक.

जन्म इ. स. १८३३ ] [ मृत्यु इ. स. १८८९

## आर्या.

म्हणतात लोक सारे—वर्षें छप्पन्न शारदा देवी
गुणमणिकरंडकीं ज्या सांठवुनी ठेव आपली ठेवी; १
देवी सरस्वतीच न सेवी लक्ष्मीहि ज्यास पाहून,
वदती वृद्ध असावा काय चमत्कार थोर याहून; २
बाहून जीस आणूं म्हणतां म्हणतां भले भले मेले,
त्या कीर्तिनेंहि निरलस दास्य जयाचें न शंकतां केलें; ३
गेले आश्चर्यानें होउनियां थक्क लोक ज्याभंवती
निर्वैर नित्य नाचत असतां पाहून त्या तिघी सवती; ४
नव्हती वाक्पटुता बहु, नव्हती अंगीं तशी जरी कविता,
कविगुरुतुल्य मतीचा होय तरी जो प्रभाव दाखविता; ५
सविता नसुनिहि निज कर शिरकवितां अल्पही जिथें आला
भासविता बहु दुःसह जो निज तेजस्विता तिथें झाला; ६
घाला जीवितवित्तावरि पाहे काळ-चोर घालाया,
म्हणुनी पळहि न ज्यानें घालविलें आपलें कधीं वाया; ७

खाया फुरसत न मिळे इतुकीं कामें असोनिही मागें
आमरणान्त जयाच्या उद्योगप्रीति मानसीं जागे; ८
रागें भरोत अथवा कोणी लावोत आपणा बोल,
जाय तिथें न परी जो वेळाला ज्या स्थळीं नसे मोल; ९
खोल विचारसमुद्रीं पोहत असतां कधीं कधीं भ्रमला
जो न परंतु कधींही वदला 'कोणी करा सहाय्य मला;' १०
कमलाच काय होती अर्ध्या वचनांत अन्नपूर्णाही,
पुस्तक परंतु ज्याच्या दृष्टीपासून हाललें नाहीं; १६
कांहीं प्रसंग येवो धरिला चित्तीं परंतु जो हेका
देतां तया न भी जो शेवटपर्यंत सारखा टेका; १२
जें काम आपणाला मिळवुनियां दे न वित्त वा मान,
करितों म्हणावया तें ज्याची नाहींच हालली मान; १३
कान न सादर कोणी देई बोलास आपल्या जिकडे
दाखविलें न कधींही ज्यानें पांडित्य आपलें तिकडे; १४
जिकडे न आपणाला पाहुनि कोणीच 'या, बसा' म्हणती,
मानी करीतसे जो त्या स्थानाला दुरूनचि प्रणती; १५
गणती न होय इतकीं असतांही पाठ पुस्तकें, ज्यानें
नामसहस्र हरीचें जावें घोकीत नित्य नेमानें; १६
ज्ञानेश्वरकृति सान्वय सार्थहि अभ्यासिली जरी होती,
श्रीहरिशिरीं तरी जो तुळसींचे लक्ष मोजुनी ओती; १७

होती स्वकीर्ति पृथ्वीपर्यटनातें करूनि जरि आली,
भावें प्रदक्षिणा जो वृंदादामोदरा तरी घाली; १८
चाली जुन्या पुराण्या ज्या ज्या त्यांची करोनियां वकिली
किल्ली लोकमताची स्वकरीं ज्यानें अखंड वागविली; १९
नागविली ही धरणी जाणत असतांहि आळसें सारी
जो धनराशि लुटाया करुनि तुला भिक्षुकांस पाचारी; २०
चारी पुरुषार्थांची असतांही योग्य जोड जोडाया
भ्याला पदोपदीं जो रूढीची पायवाट सोडाया; २१
काया झिजवी संतत सारुनियां आन्हिकें स्वयें साही
भासे म्हणून ज्याला धर्माचा ऱ्हास जाहला नाहीं; २२
राही सिद्ध कराया स्वजनांची काळजी सदा दूर
म्हणुनी म्हणे स्वधर्मी असती जो सर्व सासवा चूर; २३
धूर न परवशतेची मानेवर आपल्या कधीं बसली,
सासुरवास-चरित्रें म्हणुनि असंभाव्य सर्व ज्या दिसलीं; २४
बसली कधीं न पुस्तक सोडुनि अन्यत्र आपली दृष्टि,
सावित्रीमय म्हणुनी ज्याला ही सर्व भासली सृष्टि; २५
कष्टी होउनि कोणी बसली नव्हती निजालयीं बाळा,
म्हणती यास्तव दे जो विधवादुःखाश्रुमार्जना टाळा; २६
कालानुसार पडली जात्यभिमानांत खूट नसतांही,
देशाभिमान ज्याच्या वाणीपासून हालला नाहीं; २७

राही संतत आपण दूर जरी सोडुनी समाजाला,
गोष्टी सुधारकांच्या सगळ्या गप्पाच वाटती ज्याला; २८
आला असोनि लोकीं केवळ लोकोद्धरार्थ अवतरुनी,
दैवें लोकमताचा जो बंदा दास ठेविला करुनी; २९
तरुनी स्वयें स्वबोधें असतां क्षम अमित लोक ताराया,
न मिळे मुहूर्त ज्याला अज्ञानध्वांत दूर साराया; ३०
तो **विश्वनाथ नारायण** नामक गुणकरंड चोरून
गेला कृतान्ततस्कर घेउनियां आमच्या समोरून ! ३१
'चोरी करूं नये' ह्या धर्माच्या सर्वलोकमतनियमा
पाळित नसां खरोखर देव तुम्ही काय धर्मराज यमा? ३२
किंवा तुज भजला जो भजला जैसा न मायबापांही
त्यावरि कृपाच केली काळा तुज काय वाटतें त्वां ही? ३३
वाटो कृपा स्वभक्तावरि केली ही जरी तुला वाटे;
काळिज परंतु चरचर पाहुनि हें कृत्य आमुचें फाटे. ३४
दाटे गहिंवर कंठीं, अंगावरि राहती उभे कांटे,
लोटे दुःखाश्रूंचा पूर अतोनात लोचनांवाटे. ३५
वाटे—नको नको हा जन्म ! नको हा नको तुझा लोक !
न कळे-किती सहावें दुःख, करावा किती तरी शोक ! ३६
तुमचा न **विश्वनाथा** ! त्या काळाचाहि हा नसे दोष;
घडतात खेळ हे त्या दैवाचा जाहल्यामुळें रोष ! ३७

' पातिव्रत्यचि रक्षिलें निजगृहीं बैसोनियां आपलें,
' स्त्रीचें ऐहिक सर्वथैव म्हणजे कर्तव्य आटोपलें— '
ऐसें लोक सुखें म्हणोत, म्हणतां येई न मातें तसें;
होवो होत असेल वास्तव तरी लोकांत माझें हंसें. ४
अन्नाच्छादन देउनी निशिदिनीं जे आपणा रक्षिती,
त्यांना मानव काय वन्य पशुही अत्यादरें सेविती.
तैसा पालक आपुला समजुनी स्त्रीनें पती सेविला,
केलें काय विशेष त्यांत म्हणुनी तीनें कळेना मला. ५
पौलस्त्यासम[1] दुर्मदांध नृपती सोडोनि लज्जा जयीं
पातिव्रत्यधनावरी दरवडे घालीत होते, तयीं
त्याचें रक्षणची करोनि वरिती कीर्तीस नारी जरी,
नाहीं त्यांस विशेष काय करितां त्याहूनि येतें तरी ? ६
नारी वा नर हो करोनि पहिली ज्ञानार्जनें स्वोन्नति
अन्यांचीहि सुधारती स्वकृतिनें जे दुःखदात्री स्थिति,
केलें जन्मुनियां खरोखर जगीं त्यांनींच कांहीं तरी;
साजावीच तरी ' मनुष्य ' पदवी त्यांनाच साजे खरी. ७
झालीं गौतमशंकरादि[2] पुरुषांमाझारि रत्नें अशीं:
साध्वी तूंच इथें परंतु पहिली जन्मास येशी तशी !
ही अत्युक्ति दिसो दिसेलचि तरी देशाभिमानी जनां;
नेणें मी अभिमानची परि दुजा सत्याभिमानाविना. ८

१ रावण. २ गौतमबुद्ध, शंकराचार्य.

आज्ञा वंदुनियां शिरीं स्वपतिची जाऊनि देशांतरीं,
विद्याभ्यास तिथें करूनि, वरुनी सन्मान, येशी घरीं;
आहे गोष्ट खरी, मलाहि करणी वाटे तुझी ती बरी—
ह्यासाठींच परी न केवळ तुला माझी स्तवी वैखरी. ९

ज्या मार्गांत परंतु फार असती विघ्नें असें भावुनी
भेणें दूरचि राहिलों पुरुषही आम्ही तयापासुनी,
नारीही तुजसारखी न मळतां निर्विघ्न त्या आक्रमी
हें त्वां दाखविलें; स्तवीत म्हणुनी आहें तुला आज मी. १०

केलें साहस हें तुवां धरुनियां उद्देश जे जे मनीं
ते ते सिद्ध न होत तोंच जग हें गेलीस तूं सोडुनी !
झाली हानि खरी; पुढें न भरुनी येईल ती काढितां;
तेणें लेश परी यशोनिधि तुझा झालाच नाहीं रिता ! ११

नारी त्वत्सम थोर आर्यभुवनीं जन्मोनियां यावरी
साराया झटतील दुःखद दशा स्वीय स्वसांची दुरी;
बाई ! घालुनियां परंतु पहिला आहे धडा त्वां दिला,
आनंदें इतिहासकार म्हणुनी गातील आधीं तुला ! १२

स्त्रीनें जन्मवरी घरांत बसुनी फुंकीत जावें चुली,
बेचाळीस कुळें पवित्र म्हणजे केलीं तिनें आपलीं;
ज्यांना आवडलें असेल मत हें त्यांनीं तुला निंदुनी
घ्यावें अज्ञजनीं मिळेल तितकें धन्यत्व संपादुनी ! १३

योषिद्रत्न पडे परंतु पदरीं ज्याच्या तुझ्यासारखें
त्याचाही मज धन्यवाद नकळे गावा किती या मुखें !
केली भूषित आर्यभूच मग हीं सारी जिनें, त्या तुझें
वर्णाया यश शारदाच बहुधा आली स्वयें पाहिजे ! १४

पद्यें हीं चवदाच, काय चवदा वर्षें जरी लागती
साध्वी त्वद्गुण वर्णितां न मति ही माझी तरी भागती !
हा ! हा ! पुण्य परंतु आज पदरीं माझ्या नसे एवढें,
येई चालवितां न यास्तव मला ह्या लेखणीला पुढें ! १५

# फर्ग्युसन-विलाप.

[ मुंबईचे एक माजी गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांची पत्नी, ते काठेवाडांत प्रवास करीत असतां, मुंबईस महामारीनें एकाएकीं निवर्तली. त्यावेळीं ती गर्भवती होती. त्या प्रसंगास अनुलक्षून कवीनें नामदार साहेबांचा विलाप खालील पद्यांत वर्णिला आहे. ]

भोगाया वैभवा तूं मजसह दयिते ! आर्यभूमींत येशी,
संगें राहोनि माझ्या दिवसनिशिं हरायासही मच्छ्रमासी;
इच्छा माझी तुझीही सफल न सखये जाहली, तोंच काळें
नेलें कां गे अहा हा ! तुज निज सदनीं ओढुनी प्रेमशीले ! १

मागें ठेवुनियां तुला प्रियतमे ! त्या गुर्जराधीश्वरा
स्थापाया स्वपदीं वटोदरपुरा गेलों निघोनी खरा;
तेव्हां तूं इतवयांतची परि मला जाशील गे सोडुनी
स्वप्नींही नव्हती अनिष्ट शिरली ही कल्पना ह्या मनीं ! २

जरी सौख्यें होतों अनुभवित मी राजसदनीं
तरी होतां तूझी स्मृति सहज ये नीर नयनीं !
कधीं खातां पितां शयन करितांही न विसरें !—
अशा कांता कां गे त्यजुनि मज जाशी प्रियकरे ! ३

गृहीं परततांच मी करुनी राज्यकार्यश्रमा
बघूनि झणिं येउनी मजसमीप चेतोरमा

सदैव रमवावया झटतसे मला जी स्वयें–
कसी मजासि तीच तूं त्यजुनि आजि जाशी प्रिये ? ४
बसवुनि नृपा राज्यीं यावें तसेंच तुझ्याकडे,
परि न विधिची इच्छा तैशी–कसें मग तें घडे ?
अहह ! जवळी अंतःकाळीं तुझ्या नसवे मला,
म्हणुनि चटका चित्ता माझ्या विशेषचि लागला ! ५

जातां तुला त्यजुनि गर्भवतीस गेहीं
माझ्या मनीं उपजला द्रवलेश नाहीं–
ऐसें म्हणोत जन सर्व सुखें ! परंतु
कांते ! कधींच म्हटलें नसशील हें तूं ! ६

उद्यानांतहि मत्कराश्रय जिला चालावया लागला;
जातां किंचित दूर काय गमला जीला बहू भागला;
त्या तूझी नवनीतकोमल तनू मार्गश्रमें घाबरी
कांते ! हो न, म्हणून केवळ तुला ठेवोनि गेलों घरीं ! ७
जी तूं बालरविप्रवालकिरणीं घर्मार्द्र होतां तनू
श्वासोच्छ्वास वमीत ठेविशि मम स्कंधीं स्वकीया हनु,
कैशी ती अबला तुझ्यासम सखे ! न्यावी प्रवासांत मी ?
नेतांही मज हांसणार नव्हते पृथ्वीवरी ह्या कमी ! ८
अंतःकाळीं सखे ! तूं स्मरुनि खचित ह्या निर्दया प्राणमित्रा
दुःखें झालीस भारी असशिल बहुधा व्याकुला चारुगात्रा !

सांगूं मी काय! होतां स्मरण मज तुझें कंठ दाटून ये हा !
वाटे आतां सुखाचें स्थलचि न उरलें ह्या न चित्ता, न देहा ! ९

प्रभुवरचरणाच्या राहुनीयां समीप
वरिशिल दयिते तूं स्वर्गिं सौख्यें अमूप ;
परि मजवर आतां कोपला काल पाहीं—
असुनिहि सुख सारें भोगितां येत नाहीं ! १०

# महाराणी व्हिक्टोरिया.

जन्म २४ मे १८१९; ] [ मृत्यु २२ जानेवारी १९०१

नाहीं मावळला कवींच म्हणती राज्यीं जियेच्या रवी,
जीची दिव्य यशःप्रभा अखिल ह्या भूमंडला सारवी,
पुण्यश्लोकपदास पुण्यचरितें पुण्यापगा जी वरी,-
गेली सोडुनि काय हाय ! जन हा ती राजराजेश्वरी ! १

जी निर्माण करी सजीव पुतळी सर्वा गुणांची विधी,
वर्णाया सरसावल्या यश जिचें भाषा सहस्रावधी,
भाग्यें भाग्यवती जिच्या वसुमती झाली स्वयें भाविती,-
गेली लोकललामभूत ललना लोकांतरा काय ती ! २

होता शासनदंड राबत जरी अर्ध्या जगाचा करीं,
होत्या तिष्ठत ऋद्धि सिद्धि जवळी दासीप्रमाणें, तरी
आज्ञा वंदुनि जी सती स्वपतिची वर्ते तयाच्या मतें;-
योषिद्रत्न जनास ह्या त्यजुनियां गेलें अहा काय तें ! ३

माता होय कृतार्थ केवळ जगीं स्वापत्यसंगोपनें
ह्या भावें-निजमंदिरांत नसतां दासीजनांचें उणें-
झाली जी ममतालु माय करिती जोपा मुलांची स्वयें,
काळें प्रेमलता अहा उपडिली ती काय त्या निर्दयें ! ४

लोकांचें सुख तेंचि जी म्हणतसे सामर्थ्य माझें खरें,
रक्षाया निजराज्य जी मज म्हणे संतोष त्यांचा पुरे,
झाली धन्य कृतज्ञ पाहुनि जनां जी आपणा मानिती,—
गेली सोडुनि काय हाय! जन हा **व्हिक्टोरिया** माय ती! ५

गेली आंग्लमही! तुझीच तनया गेली न व्हिक्टोरिया,
गेलें आज वसुंधरा म्हणतसे सौभाग्य माझें लया!
गेली सोडुनि लोक हो न सदया राणीच ती आपणां,
गेल्या शांति दया क्षमा सुजनता स्वर्गास गेल्या म्हणा! ६

नाहीं अंतरली तुझीच जननी **एड्वर्द** राया तुला!—
गेली सोडुनि माय ती समज ह्या चाळीस कोटी मुलां!
ज्या एक्याच गुणें तिच्या तिजवरी श्रद्धा प्रजांची जडे,
तें वात्सल्य पदोपदीं स्मरुनियां हा लोक सारा रडे! ७

जन्मा येउनि होय सर्व करिती कर्तव्य ती आपलें,
जाई जोडुनि तेंहि पुण्य यश जें कोणीं न संपादिलें,
शोच्या ती न सती-म्हणूनि म्हणती तत्त्वज्ञ. सारें खरें;
मायामोह परंतु हा नरवरा! कोणा नरा आवरे! ८

जाती तत्त्वविचार सर्व विलया होतां तियेची स्मृती?
साऱ्या येउनियां तिच्या कृति उभ्या डोळ्यांपुढें राहती!
येई दाटुनि कंठ, अश्रु सहजें नेत्रांतुनी वाहती!
भासे सर्व उदास लोकजननीवांचून त्यां ही क्षिती! ९

आहे काय उपाय ? जें विधिवशें होणार तें जाहलें !
नेई दैव निधान तें हरुनि जें तेणेंच होतें दिलें !
गेला देह तिचा परंतु यश जें मागें तिचें राहिलें,
आचंद्रार्क धरेस ह्या निजशिरीं तें पाहिजे वाहिलें ! १०

नाहीं संशय, आपली समजुनी ती सर्वही संपदा
ही वाहील वसुंधरा निजशिरीं तें आवडीनें सदा !
फेडूं केविं परंतु आपण नृपा ! त्या माउलीच्या ऋणा ?—
चित्तीं संतत काळजी वसविली ही पाहिजे आपणां ! ११

ती जो घालुनि दे धडा वळवितां तो नीट आला तुला,
राया ! सर्वहि कार्यभाग म्हणजे त्वां आपला साधिला !
व्हाया मुक्त तिच्या ऋणांतुनि तुला हा मार्ग सोपा जसा,
नाहीं अन्य तसा विचारुनि पहा तूं आपल्या मानसा ! १२

आम्हीही स्मरुनी तिच्या उपकृती उत्तीर्ण व्हाया तिला,
जें कांहीं करवेल तें करुनियां सेवूं प्रमोदें तुला;
जें जें इष्ट तुला, यशस्करहि जें **व्हिक्टोरियेच्या** कुळा,
होवो तें करुनी ऋणांतुनि तिच्या हा लोकही मोकळा ! १३

देई लावुनियां तुझीच जननी आम्हांस ज्याची रुची
त्या प्रेमेंच पहात जा सतत तूं दुःखें सुखें आमचीं !
ठेवी माय तसेंच ठेवुनि सदा लक्ष्य प्रजापालनीं
राज्याचाच तिच्या न होउनि रहा त्याही यशाचा धनी ! १४

धर्म न्याय दया क्षमा विचरती जेथें सदा सर्वदा,
त्या राज्यीं नृपमानसीं रिपुभया थारा मिळेना कदा;
राया ! हें चतुरंग सैन्य म्हणुनी ठेवोनि संगें तुवां
जावें निर्भय वाढवीत भुवनीं स्वीया यशोवैभवा ! १५

राया ! देव तुला चिरायु करुनी ठेवो सदाही सुखी !
होवो कीर्ति तुझी निवास करिती दाही दिशांच्या मुखीं !
दैवें मूर्तिमती सुकीर्तिच तुला जी लाधली त्वत्प्रिया,
साध्वें सारुनियां जनावन तिच्या हो धन्य लोकांत या ! १६

हा हा ! आपण हा विचार पुढचा पाहूं पुढें आपला;
आधीं शेवटचा निरोप तिजला सप्रेम देऊं चला !
जा गे ! जा ! बहु भागलीस करुनी लोकोपकारोद्यमा !
जा स्वर्गीं बस हारवीत बस जा आई सुखें स्वाश्रमां ! १७

जा येतील तुला समोर सगळ्या त्या स्वर्गमार्गीं सती !
पुण्यात्मे करितील पाहुनि तुला पुण्यापगेला नती !
जा माये ! भगवत्पदीं चिर तुझा आत्मा सुखानें वसो !
आशीर्वाद तुझा मुलांवर तुझ्या ह्या सर्वदाही असो ! १८

## लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर.

जन्म ४ मार्च १८६५.] [मृत्यु ११ फेब्रुवारी १९०१.

सर्वांगसुंदरा ही कविकुलगुरु कालिदासकृति असली,
प्राकृतजनां तथापि न ती वल्कलधारिणी तशी दिसली. १
बसली सात्विक सदनीं जात्या असुनि रजोगुणोपेता;
वदली सुललित संस्कृत-वाणी नसुनीहि जाणता श्रोता. २
लीलावती स्वभावें असुनि मिळेना कुणी गुणग्राही,
लोप म्हणूनि जियेच्या ललित गुणांचाहि होउनी राही. ३
द्रवला बघुनि अशी ती कविकन्या **पांडुरंग**-तनय कवी;
दैवहि तिचें तयाची कांस धरायास आग्रहें सुचवी. ४
लज्जावती तरी ती 'ध्या मज पदरांत, ध्या !' म्हणे स्पष्ट;
'करवा रसिक जनांची भेट, मला साहती न हे कष्ट!' ५
**अण्णा** म्हणे 'मुली ये ! दे हा प्राचीन वेष सोडून !
शुद्ध मराठिण होउनि घे रसिकांचाहि लोभ जोडून !' ६
'हूं' म्हणतांच तिला तो नेसविता होय पैठणी साडी;
शिकवुनि बोल मराठी बोलाया, **लक्ष्मणा**कडे धाडी. ७
अभिनव अभिनयलीला तिजकडुनी **भाउराय** तो करवी;
नुरवी भगिनीक्लेशां रसिकजनांच्याहि कामना पुरवी. ८
जो तो गुरुशिष्यांच्या कविकन्येच्याहि दर्शना जाय;
जागा मिळे न लोकां ठेवाया रंगमंडपीं पाय. ९

हा धन्य धन्य **अण्णा**, कोणी तो **भाउराय** धन्य म्हणे;
एकापरीस दुसरा एक म्हणे सरस होय खास गुणें. १०
न बसे थाप डफावर, नीरस होऊनि लावण्या बसल्या;
हरिलें संगीतानें भान, तिथें नाच बैठकी कसल्या ! ११
घुंगुर तोडुनि टाकुनि, खुंटीला लावुनी विणा टाळ,
गणपतिसरस्वतीसह बसले निश्चित बाळगोपाळ ! १२
अललल न पडे कर्णीं, मौन बकासुर हिडिंब आदरिती;
रानोमाळ पलायन शूर्पणखा त्राटिका बकी करिती. १३
गाणीं मागें पडलीं सगुणा शांता अनी बनी तापी
म्हणती, मुरोनि गेल्या वृत्ति सुभद्राशकुंतलालापीं. १४
पदवीधरही झाले लुब्ध, तिथें बायका मुलें काय !
म्हणती सर्व अहा ही धन्य महाराष्ट्र-भारतीमाय ! १५
निज भजनीं रत झाला सर्व महाराष्ट्रदेश पाहून
इष्ट मराठी भाषा अन्य म्हणे मज नसेच याहून. १६
वाढे जनीं रसिकता सदभिरुचिहि सहज वाढती झाली;
कवि म्हणती तुज सुदशा सत्य महाराष्ट्रभारती आली. १७
करुनि पराक्रम इतका सर्व महाराष्ट्रमंडलामाजी
गाजी म्हणवुनि घेते नट असती ते कुठें अहा आजी ! १८
नाटयाचार्य कुठें हो असती **बळवंतराव अण्णा** ते ?
विसरूनि काय गेला रसिकांचें **भाउराय**ही नातें ? १९

नगर वाचनालय, सातारा



गेले अहा रसिक हो ! गेले ते मित्र अन्य लोकातें !
अवतारकार्य त्यांचें झालें संपूर्ण त्यांचिया हातें ! २०
भरतमुनीश्वर तुमच्या **अण्णाला** सुरसभेंत बसवील !
संदेह काय, **भाऊरायहि** गंधर्वलोक वसवील ! २१
संगीत काय, सादर निज भाषेची करावया सेवा
निज बांधवांस लावुनि सुयशाचा जोडिला तिहीं ठेवा! २२
अभिनय अंतरला तो जरि मधुरालाप तोहि अंतरला,
उरला तथापि आहे त्याचा संस्कार मानसावरला ! २३
इतिहासकार त्याच्या हितपरिणामा सदा पहातील;
कविवर त्या **अण्णाच्या भाऊच्याही** यशास गातील ! २४

नगर वाचनालय सातारा

## हरि महादेव पांडित.

जन्म २१ दिसेंबर १८४९ ] [ मृत्यु १५ मार्च १८९९.

नाहीं जन्म दिलें तथापि जननी कोणी करीना जसा
प्रेमानें प्रतिपाळ नित्य करुनी बत्तीस व र्षें तसा,
मायेचें न पडूं दिलें स्मरणही ज्या मावशीनें मला—
जाई सोडुनि ह्या जगास मजही ती **जानकी** प्रेमला ! १

'नाहीं शोकरसीं मजा, रस तरी कां आळवाना दुजा?'—
जींचे हे परिसोनि बोल दिधली म्यांही विलापा रजा;
अन्तर्बाह्य सुशीतला सुविमला भागीरथीसारखी,
गेली सोडुनि तीहि मूर्त कविता हा लोक माझी सखी ! २

दे तो जन्मचि तात, कर्म परि हें **तात्या**मुळें* ज्या मिळे,
पुण्यें पूर्वकृतेंच जो सुमतिचा दाता मला आढळे;
ऐश्वर्यीं न चळे, ढळे न सहसा कर्तव्यकर्मव्रतीं,
गेला सोडुनि **नीळकंठ**हि * मला तो दिव्यलोकाप्रती ! ३

साजे पंडित पंडितांत, मिरवे वक्त्यांत वक्ता तसा,
पुण्यश्लोक जया उठोनि म्हणते अत्यादरें 'या बसा !'
दिक्प्रांत स्वयशें भरी, निजगुणें चित्तें जनांचीं हरी,
स्वर्गारोहण तो अजातरिपुही **तेलंग**नामा † करी ! ४

* नीळकंठ महादेव मोगरे. † काशीनाथ त्रिंबक तेलंग.

योगाभ्यास करी न जो पद तरी योगीश्वराचें वरी,
होई वंद्य जनांहि वंद्य नव्हता जो ब्रह्मवेत्ता तरी;
सोडीना व्यसनींहि शांतनवशी शांतीस ज्याची मति,
**मामा**[1] तेहि निघोनि जाय परमानंदप्रदेशाप्रती ! ५

दैवानें असतां चुकोनि खरडीं घासावया लाविला
मानी बुद्धिबळेंच 'पंडित'पदा जो आपल्या पावला;
ज्याचे सायणमल्लिनाथहि सुखें होऊं पहाते सखे,
विद्वद्रत्नहि काळ तस्कर हरी तें **शंकरा**[2]सारखें ! ६

वर्षें चार सुभाषितीं सुरुचिरीं ' मित्रोदयीं ' त्या जसा
झाला लोकमनांस जो रमविता ' इंदुप्रकाशीं ' तसा;
शांतीचा पुतळा सती सुमतिचा आनंददायी मला
गोविंदात्मज तो **गणेशहि**[3] भला सायुज्यता पावला ! ७

विद्वत्तेंत नसोनि पंडित जगन्नाथाहुनी जो उणा
अंगीं वागवितां न लेशहि जया आला कधीं मीपणा,
तोही **लक्ष्मण रामचंद्र**[4] करुनी संसारयात्रा पुरी
गेला सोंपुनि 'भामिनीविलसिता' ह्या आळशाच्या करीं ! ८

लोकीं वाढवुनी पुरातन कथाकाव्येतिहासीं रती,
ज्योतिःशास्त्रविदांहि जो शिकविता झाला गृहांच्या गती;

१ नारायण महादेव परमानंद. यांस त्यांचे इष्टमित्र मामा म्हणत असत. २ शंकर पांडुरंग पंडित. ३ गणेश गोविंद नाडकर्णी. ४ लक्ष्मण रामचंद्र वैद्य.

शिष्यीं मागितला गुरु प्रतिभवीं ज्या मोडकासारखा
तोही काळमुखीं जनार्दन[1] पडे विद्वज्जनांचा सखा !		९
मोहा जो न वळे, ढळे न अथवा निंदास्तुतीच्या बळें,
आचारास विचार मित्र म्हणती ज्याच्या प्रयत्नें मिळे;
लीलेनेंच हवी तशी नटवुनी ही देशभाषा नटी
लावी पंडितही तदीय भजनीं जो मोठमोठे हटी;		१०
रूढींच्या दरडी असंख्य असतां मार्गांत चोहींकडे
धैर्ये चालविता सुधारकचमू जो वीर झाला पुढें,
त्या **गोपाळ गणेश आगरकरा** आर्यप्रदीपासही
काळें मालवुनी तमोयम अहा केली पुन्हा ही मही !	११
जेणें पाहुनि गर्वभार हरिला वाक्संगरीं आपला
'मालाकार' हि हार घेउनि म्हणे–हा 'वाद नाहीं भला.'
नेतां गोंडवनांतुनी रघुवरा निर्वंध रामेश्वरीं
स्पर्धा वीर कुरुंदवाडकरही ज्याच्या यशाची करी;		१२
होता कोण **मुकुंदराज** ? म्हणते ज्ञानेश्वरी काय ती ?
आहे गोड सुधारसाहुनि किती **मुक्तेश्वरा**ची कृती ?
विप्रीं नेउनियां बळें बुडवितां नाहीं बुडाली जळीं,
**एक्या**ची अजरामरा कृति-अशी होऊनि कां राहिली ? १३
**नाम्या** होऊनि नामदेव बसला लोकांत कोण्या गुणें ?
घालावीं म्हणती जनीस कवि कां साष्टांग लोटांगणें ?

1 जनार्दन बाळाजी मोडक.

१०-७-५६
८८७६
५५५३०६
५-५२

तोंडीं संतत दासबोधवचनें कां आमच्या राहती ?
झाला देशहितार्थ काय करिता तो जावळीचा यती ? १४
ब्रह्मानंदभरीं नरां नरवरां दिंडी पताका करीं
घ्याया लावुनि नाचवीत असतां त्या वाळवंटावरी,
श्रीवैकुंठपुरी करोनि दुसरी जो दाखवी पंढरी,
वाणी काय अशी अलौकिक असे त्याही **तुक्याची** तरी ? १५
कैसी पाजुनि **वामनें** नवरसीं ही पुष्ट केली गिरा ?
कां तो **श्री**धर पात्र होउनि बसे सर्वत्र लोकादरा ?
वाग्देवीप्रति नाचवीत असतां बारामतीचा शिखी,
चेतोवृत्तिहि नाचतात म्हणती कां आमच्या पारखी ? १६
आहे वाङ्मय आपलें नवरसीं ओथंबलें हें किती ?—
लोकां बोधहि काय काय करिती त्या पूर्वजांच्या कृती !—
आम्हां सर्वहि 'काव्यसंग्रह'मिषें हें जो सुधी दाखवी,
गेला **वामनराव ओक*** विलया तोही कवींचा कवी ! १७
' गेलीं काय न माणसें निघुनियां हीं चांगलीं चांगलीं ? '
' निद्रा काय सरस्वतीस तुमच्या होती तयीं लागली ? '
हा ! हा ! प्रश्न करूं नकाच मज हे ! देऊं नका ती स्मृती !
झाली काय तयीं मलाच नकळे माझ्या मनाची स्थिती ! १८
आलें शंभरदा मनांत, धरिली हातांतही लेखणी,
होती साह्य सरस्वतीहि, नव्हतें गेहीं रुसाया कुणी.

* वामन दाजी ओक.

नगर वाचनालय सातारा

'गोडी शोकरसीं न' हा ध्वनि परी कर्णीं जसा आदळे,
आपोआपचि ह्या करांतुनि तशी ही लेखणीही गळे ! १९

बोलावोनि परंतु मोरमकरें त्या रामकृष्णें मला
'वाचा' सांगुनि 'देशसेवक' जयीं माझ्यापुडें ठेविला,
काळी रेघ चहूंकडे पसरतां त्या पत्रकीं पाहुनी
नेला कोण नरावंतस म्हटलें काळें अहा बाहुनी ! २०

हा ! हा ! तों इतक्यांत खिन्नवदनें मन्मित्र सांगे मला—
'गेला हो हरिपंत पंडित ! सखा गेला दिवीं आपला !'
वाणी कर्णकपाट फोडुनि शिरे ती अंतरंगीं जयीं,
वाटे घोर विखार काय हृदया तोडूं पहाती तयीं ! २१

आली शोकरसास पूर्ण भरती, उद्विग्न झाली मती,
होत्या दाबुनि ठेविल्या उसळत्या झाल्या पुन्हां त्या स्मृती;
गेला निश्चय भंगुनी, विसरही मौनव्रताचा पडे,
घेई धांव नको नकोहि म्हणतां वाणी विलापाकडे ! २२

बोलूं काय ? अहो नसोनि बघतां कोणी सखा सोयरा,
वर्षें षोडश लाभ लोभ नसतां कांहीं कशाचा खरा,
जेणें केवळ आपला म्हणवुनी हा सिंचिला मोगरा,
गेला आटुनि काय तो सुरुचिर प्रेयामृताचा झरा ? २३

[ अपूर्ण. ]

वाचनालय सातारा ... ३६, भवानी ...
दि. ९-७-५८
१८७८२
५५५४३९
९-५८